www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 270 वा शनिवार दि. 14 जून २०२५ किंमत : 2 रु पृष्ठ : ४

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शिर्डी साईबाबा मंदिराला भेट वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी १० लाख रुपयांची देणगी





**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

माजी खासदार लोकप्रिय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नुकतीच शिर्डी येथे साईबाबा समाधी मंदिराला भेट दिली. त्यांनी श्री साईबाबांचे मनोभावे दर्शन घेतले आणि समाधीस्थळी साई चरणी नमस्कार केले. तसेच समाजहितासाठी यापुढेही बळ मिळत रहावे अशी प्रार्थना केली. यावेळी त्यांच्या समवेत भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख उपस्थित होते. या भेटी दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी तब्बल १० लाख रुपयांची देणगी दिली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा समाजसेवेचा मोठा वारसा असून आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकास यासारख्या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. साईबाबा संस्थानच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांसाठी केले जाणारे आरोग्योपचार कार्य पाहता, त्यांनी ही देणगी देऊन समाजातील गरजू घटकांसाठी आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे. ट्रस्ट अधिकाऱ्यांच्याकडे या देणगीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. लोकनेते रामशेठ ठाकूर हे सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय असून, रायगड जिल्ह्यातील विविध उपक्रमांमधून त्यांनी आजवर हजारो लोकांचे जीवन समृद्ध केले आहे. शिर्डी दौऱ्यादरम्यान त्यांनी संस्थान ट्रस्टचे विविध प्रकल्प, रुग्णालय व अन्नछत्र सेवा यांची माहितीही घेतली आणि ट्रस्टच्या कार्याची प्रशंसा केली.

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

### महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा अधिकारी अभियंता पाईप लाईन फुटली दुर्लक्ष



**दै युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

उल्हासनगर नंबर 04 सुभाष टेकडी तक्षशिला विद्यालय जवळ उल्हासनगर नंबर 04परीसरात पाण्यासाठी नागरीकांना वणवण भटकावे लागत असतांना मात्र महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाचा ढीसाळ कारभारामुळे लाखो लिटर पीण्याचे पाणी गटारात वाया जात आहे.पाण्याची पाईप लाईन फुटली. बेजबाबदार कार्यकारी अभियंता घुले, परमेश्वर बुडगे, अश्विन राठोड यांची पदावरून त्वरित हकालपट्टी करा..जनतेची मागणी होत आहे घटनेकडे दुर्लक्ष करणे फक्त आपला पगार आणि पद हेंच महत्वाचे आहे बाकी काही देणं घेणं नाही हेंच चाललंय आता हेच खातं नाही तर सर्वच सरकारी अधिकारीच्या बोंबाबोंब आता सध्या चालू आहे

# बच्चुभाऊ कडू यांच्या अमरण उपोषणाची शासनाने तात्काळ दखल घ्यावी :- जिलानी शेख

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

दिव्यांग, शेतकरी बांधवाच्या मुख्य मागण्यासाठी शेतकरी दिव्यांगाचे नेते बच्चुभाऊ कडू हे गेल्या सहा दिवसापासुन अमरण उपोषणास बसले असुन त्यांची प्रकृती अंत्यत खालवली असुन महाराष्ट्र शासनाने तात्काळ दखल घेऊन त्यांच्या मागण्या मंजुर कराव्यात नसता बीड जिल्ह्यात सर्व तहसील कार्यालया समोर दिव्यांग बाधव व शेतकरी योग्य प्रकारचे आंदोलन करतील याची नोंद घ्यावी. असे प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समितीचे नेते जिलानी शेख, शेख आलमभाई यांनी म्हटले आहे. माजी आमदार खालवली आहे त्यांच्या जीवितास काही धोका निर्माण झाला आहे याची महाराष्ट्र शासनाने दखल घ्यावी व त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात नसता बीड जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधव रस्ता रोको किवा तहसील कार्यालाया समोर आंदोलन करतील यांची नोंद घ्यावी. असे प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र चे जिलानी शेख, शेख आलमभाई, अशोक दगडखैर, वैभव देशमुख, संतोषकुमार राख, ईश्वर आमटे, बजरंग लांडगे, शेख नदीम, शेख मतीन, ईश्वर माने, संतोष गुंजाळ, हनुमंत काळुशे यांच्या सह इत्यादी दिव्यांग बांधवानी म्हटले आहे.



बच्चूभाऊ कडू हे शेतकरी, दिव्यांग यांच्या मागणीसाठी गेल्या सहा दिवसापासून आमरण उपोषण करत आहेत त्यांची प्रकृती अत्यंत

# नैताळे येथील पायलट दीपक पाठक यांचे अहमदाबाद विमान दुर्घटनेत निधन..

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



विंचूर:-(नाशिक) : अतिशय दुर्देवी कालच्या विमान दुर्घटनेत नैताळे येथील भुमीपुत्र, बाळासाहेब बाबुराव पाठक यांचा एकुलता एक मुलगा दिपक यांचे दुर्देवी निधन झाले. ते एअर इंडिया मध्ये को - पायलट होते. निफाड तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील जुन्या पिढीतील स्व. बाबुराव पाठक व पंचायत समिती च्या तत्कालीन सदस्या शांताबाई पाठक यांचा हा गुणी नातु आणि रेल्वे खात्यात कार्यरत असणारे बाळासाहेब पाठक यांचा हा मुलगा. परेल च्या बीडीडी चाळीत हे कुंटूब राहत. भारतमाता पासुन पुढे पायी चालत गेल्यावर बीडीडी चाळीतील बिल्डींग मध्ये यांचे वास्तव्य. रिटायर नंतर बदलापूर ला वास्तव्यास आले होते. काल ची घटना या परिवारा साठी अतिशय दुर्देवी. नैताळे सह परिसरात दिपक यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# आष्टी तालुक्यातील वतनवाडी येथील शेतकरी अर्जुन कासार यांचे चक्रीवादळामुळे लाखोचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**

आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथील शेतकरी अर्जुन कासार यांनी आठ एकरवर डाळिंब बाग जोपासली होती.. मागील वर्षी त्यांना या बागेतून 60 लाखांचे उत्पन्न झाले.. यावर्षी यातून एक कोटींचे उत्पन्न हाती येणार होते.. पुढील पंधरा दिवसात बाग तोडणीसाठी येणार होती.. मात्र परवा बुधवारी झालेल्या चक्रीवादळ व पावसामुळे स्वप्नांचा चुराडा झालाय. या फळबागेतून आलेल्या उत्पन्नातून मुलाला एमबीबीएस करायचे स्वप्न कासार यांनी उराशी बाळगले होते.. मात्र 11 मे रोजी झालेल्या पावसानं होत्याचं न्हवत केलं.



# "पिलीवची कन्या ॲड. मोहिणी देवकर विधीज्ञ विभागातील (मास्टर) परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण"

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक**
**प्राचार्य जगन्नाथ रासवे:**

-माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य कै. गणपत बाळासो देवकर यांची नात व पत्रकार रघुनाथ गणपत देवकर यांची कन्या ॲड. मोहिनी देवकर हिने सावित्रीबाई फुले युनिव्हर्सिटी पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२५ मध्ये घेतल्या गेलेल्या विधीज्ञ विभागातील एलएलएम (मास्टर) या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून प्रथम श्रेणीत येण्याचा बहुमान घेऊन यशाला गवसणी घालून पदवी प्राप्त केलेली आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर जिल्हा परिषदेचे मा .सभापती संग्राम सिंह जहागीरदार,पं.स.मा. सदस्य सौ ताई महाडिक, गुरुभक्ती भूषण हरिहरनंदन उर्फ रवींद्र करमाळकर महाराज, रामायण समिती पिलीव यांनी अभिनंदन केले तर सद्गुरु श्री. श्री. सा.का. लि. श्री .श्रीनगर (राजेवाडी) चे चेअरमन एन. शेषागिरी रावसर, व्हाईस चेअरमन डॉ.बाळासाहेब कर्णवर पाटील संचालिका सौ उषाताई मार्कड, व संचालक मंडळांनी यथोचित सन्मान केला.



या उत्तुंग यशाबद्दल आपले विचार व्यक्त करताना ॲड. मोहिणी देवकर यांनी सांगितले की, माझ्या या शैक्षणिक कालावधीत सर्व परमेश्वरांच्या आणि सर्वांच्या आशीर्वादाने मला यश मिळाले असून माझे आजोबा कै. गणपत बाळासो देवकर, श्री तुकाराम दाजी जगताप, माझे चुलते कै. वसंत गणपत देवकर ( सेवानिवृत्त वनपाल), यांनी माझ्या बालपणीच मला विधिज्ञ क्षेत्रामध्ये जाण्याचा सल्ला दिला असल्याने मी या क्षेत्रामध्ये वाहून घेतले आहे आणि एलएलबी नंतर शिवाजीनगर पुणे येथील जिल्हा न्यायालयात मोठ्या उत्साहाने प्रॅक्टिस करीत राहिले, हे सांगत असतानाच तिने आवर्जून सांगितले की या क्षेत्रातील माझे गुरु ॲड. किरण गंजकरसर ,श्री विनायक जाधव(पं.स.शिराळा), औषध निर्माता श्री. प्रकाश जाधव, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे श्री विशाल देवकर, बायर कंपनीचे श्री विजय देवकर त्याचप्रमाणे जि.प. मुलींची शाळा पिलीव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कै रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालय पिलीव, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय (कमवा आणि शिका योजना) पंढरपूर, शिवाजी मराठा विधी महाविद्यालय पुणे, आणि माझ्या शैक्षणिक जीवनाला प्रोत्साहन देणारी पिलीव ग्रामपंचायत, श्रीराम गणेश मित्र मंडळ पिलीव, श्रीराम दुर्गा माता मंडळ पिलीव, तसेच सर्वच गणेश मंडळे, सर्वच नवरात्र महोत्सव मंडळे, पत्रकार संघ ,ज्ञात ,अज्ञात अशा सर्वांचाच या यशामध्ये सिंहाचा वाटा आहे, हे मी कधीच विसरणार नाही. आणि या माझ्या सर्व वाटचालीत माझी आई, माझे सर्व बंधू, सर्व भगिनी आणि जीवाभावाच्या मैत्रिणी यांनी एवढे सहकार्य केलेले आहे की ,ते मी शब्दात सुद्धा वर्णन करू शकत नाही, असे विचार व्यक्त केले. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल विविध संस्था, तरुण मंडळे ,पाहुणेरावळे सगेसोयरे ,नातेवाईक या सर्वांकडून दूरध्वनी वरून तिच्यावरती कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# स्व. रावसाहेब शिंदेंच्या आठवणींना उजाळा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दिवंगत ॲड. रावसाहेब शिंदे यांची जयंती, ज्युनिअर कॉलेजच्या नूतन वास्तूचे उद्घाटन आणि पुरस्कार प्रदान सोहळा बुधवारी (दि. 11) श्रीरामपूर येथे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. शिंदे यांच्या कार्याचा आढावा घेऊन आठवणींना उजाळा दिला. ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान संचालित विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, खासदार निलेश लंके, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, एमकेसीएलचे अध्यक्ष विवेक सावंत, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.





देशमुख, अरुण कडू, मीनाताई जगधने, अविनाश आदिक, डॉ. राजीव शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे, टी.ई. शेळके, डॉ. शंकरराव गागरे, लकी सेठी, रोहित शिंदे, रश्मी शिंदे आदी उपस्थित होते. संगणक साक्षरतेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहचवणारे एमकेसीएलचे प्रमुख विवेक सावंत यांना या वेळी ॲड. रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणारे, नवनवीन संधी देणारे रावसाहेब शिंदे यांचे योगदान अमूल्य आहे. आज ते हयात असते, तर आपण त्यांच्या जन्मशताब्दीचा मोठा सोहळा साजरा करत असतो.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, रावसाहेब शिंदे हे जीवनभर गरिबांसाठी जगले. त्यांच्या विचारांचा प्रभाव माझ्या जीवनावर झाला, असे सांगून संस्थेच्या कार्यासाठी 50 लाख रुपयांची अतिरिक्त देणगी जाहीर केली. रावसाहेब म्हणायचे, जो देतो तो देव, जो राखतो तो राक्षस. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मी ही मदत करत आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले. पुरस्कारार्थी विवेक सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, दहीहंडीमध्ये शेवटी वरचा मुलगा बक्षीस घेतो, पण त्याला वर नेणारे, सर्व मजले उभारणारे सहकारी खरे योगदान देणारे असतात. आजचा हा सन्मान माझ्या पालकांचा, गुरूजनांचा, सहकाऱ्यांचा आणि पत्नी डॉ. संगीता सावंत यांचाही आहे. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेमध्ये काम करताना रावसाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देणारे वातावरण दिले. त्यांच्या जाण्याने रिक्तता निर्माण झाली असली, तरी त्यांनी लावलेले ज्ञानाचे रोप आज वटवृक्षात परिवर्तित झाले आहे. डॉ. चंद्रकांत दळवी, विवेक सावंत, भगीरथ शिंदे आदी मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रेरणा शिंदे, उपस्थितांचे स्वागत डॉ. राजीव शिंदे आणि सूत्रसंचालन प्राचार्य विनोद रोहमारे व प्राचार्य वर्षा धामोरे यांनी केले, तर आभार रोहित शिंदे यांनी मानले

# त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती विद्यमाने नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात कारेक्रम

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ वार्ताहर**

आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांच्या वतीने त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती विद्यमाने नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे दर गुरुवारी सकाळी 11 वाजता मोफत व्यसनमुक्ती जनजागृती संवाद नविन शिकावु लर्निंग लायसन्स काढण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी मोफत मार्गदर्शन व्यसनमुक्त जिवन काळाची गरज का व्यसनामुळे आपल्या शरिरातील सर्व अवयव असे खराब होतात व आपण आजही पडतो कुटुंब उद्ध्वस्त होऊन संसार व्यसनामुळे रस्त्यावर येतो चांगले सवयीमुळे आपलं आयुष्य सुखाचे समाधानाचे भरभराटीचे होते म्हणून व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले जाते मा सौ हेमागिनी पाटील मॅडम प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे जिल्हा यांच्या विशेष संकल्पनेतून,मा श्री दत्तात्रेय सांगोलकर साहेब उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई,मा श्री गजानन गावंडे साहेब सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई,यांच्या विशेष सहकार्याने सौ विद्या शिंदे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सौ रचना गावीत सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक,मा गणेश लव्हाटे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मा तुषार कदम सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्त जिवन काळाची गरज प्रमुख मार्गदर्शक (आपला माणूस) श्री दिलीप किसनराव आमले गेल्या अनेक वर्षांपासून मोफत संवाद मार्गदर्शन सादरीकरण करीत आहे व्यसनमुक्ती जनजागृती मोफत मार्गदर्शन.करण्यासाठी संपर्क साधावा 9594424234/9821692756



# सिल्लोड एसटी महामंडळाची विशेष तपासणी मोहीम बनावट कार्डधारक धास्तावले!

## एसटी महामंडळ व महाराष्ट्र शासन छाननी करून कारवाई करणार का?

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** 10 जून पासून एसटी महामंडळाने विशेष बस तपासणी मोहीम सुरू आहे .त्यामध्ये ग्रामीण तथा लांब पल्ल्याच्या बस तपासणी अधिकारी कसून तपासत आहे. त्यातल्या त्यात 75 वर्ष सवलत मोफत प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचे आधार कार्ड- मतदान कार्ड चे पहिल्यांदाचं महामंडळाचे अधिकारी फोटो घेत असल्याने महामंडळाचे कौतुक होत आहे .सिल्लोड बसस्थानक व ग्रामीण भागातील बस तपासणी सुरू आहे. त्यासाठी विभागीय पातळीवर व आगारात विशेष तपासणी पथकाची नेमणूक केली आहे.





*अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांची छानणी होणार ?*

एसटी महामंडळाचे 75 वर्ष वयावरील नागरिकांना बस मध्ये मोफत प्रवास करण्यासाठी सुविधा आहे परंतु काही 75 वर्षाआतील महाठग प्रवाशी आधार कार्ड, मतदान कार्ड व पॅन कार्ड यामध्ये शक्कल लढवून फेरफार करून मोफत प्रवास करतात.

सदर अचानक एसटी महामंडळाच्या सूरू केलेल्या मोहिमेने अशा महाठगांना भविष्यात कारवाई होईल याची भिती वाटत आहे. आपल्या आधार कार्ड- मतदान कार्डची अधिकाऱ्यांनी फोटो काढल्याने आपल्यावर भविष्यात कारवाई होऊन फसवणूक केल्याप्रकरणी गून्हे दाखल होतील याची भीती आहे. तपासणी अधिकारी यांनी फोटो कशासाठी घेतले त्याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे .एस टी महामंडळ तसेच महाराष्ट्र शासन जेष्ठ अमृत प्रवाशी यांची भविष्यात छानणी करणार आहे का? अशी उलट सुलट चर्चा प्रवाशांमध्ये तसेच एसटी कर्मचाऱ्यांमध्ये सुरू आहे. काही वाहकांनी बनावट कार्ड धारकांवर कारवाई व्हावी यासाठी तहसीलदार सिल्लोड पोलीस स्टेशन सिल्लोड आगार प्रमुख सिल्लोड यांना लेखी तक्रार दिली होती .त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन व एसटी महामंडळ बनावट आधार कार्ड व मतदान कार्ड धारक यांची छाननी करून संबंधितांवर कारवाई करेल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---




# १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त...

**दैनिक युवक आधार**
**रायगड : ( नितीन लोखंडे )**

मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाची प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज तयार करून रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी... जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने एवढाच उद्देश..

"रक्तदाता" हा रुग्णांचा जीव वाचविणारा महत्त्वाचा दुवा आहे. अनेक वर्षांपासून ज्या रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी ठेवून आयोजित रक्तदान शिबिरात, रक्तकेंद्रात स्वयंस्फूर्तीने जवळच्या शासन मान्यता प्राप्त रक्तकेंद्रात गरजू रुग्णांसाठी रक्तदान (२५,५०,१०० किंवा त्यापेक्षा जास्त वेळा )केलेल्या रक्तदात्यांप्रति आभार व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे "१४ जून जागतिक रक्तदाता दिन".

मानवाचे प्राण वाचवण्यासाठी ज्या रक्तदात्यांनी आपले स्वैच्छिक रक्तदान करुन रक्तदात्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस..... म्हणजे १४ जून जागतिक रक्तदाता दिवस..

ए,बी,ओ 'रक्तगटाचा जनक ' कार्ल लँडस्टेनर यांच्या जयंतीदिनी १४ जून हा 'जागतिक रक्तदाता दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. सहानुभूती व सामाजिक बांधिलकी व स्वेच्छेने रक्तदान करणारे रक्तदाते यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा 'जागतिक रक्तदाता दिवस' साजरा करण्यात येतो.

या वर्षाचे शासनाचे घोष वाक्य आहे,
रक्त देऊ या..आशा जागवू या.
: एकत्रितपणे जीव वाचवू या...।"
"GIVE BLOOD, GIVE HOPE: TOGETHER WE SAVE LIVES..!"

आधुनिक तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात प्रगत झाले असले तरी पण अजूनही मानवी रक्ताला कुठलाही पर्याय आजपावेतो मानवाला अथवा शास्त्रज्ञांना सापडला नाही. यासाठी माणसाचे प्राण वाचवण्यासाठी मानसाचेच रक्त लागते. हे आजही जगजाहीर आहे.

कुणाला कधी आणि कोणत्यावेळी रक्ताची गरज भासू शकते हे कोणीही सांगू शकत नाही.

" रक्त "हे प्रत्येक मानवाच्या शरीरात तयार होत असते. रक्तदान ही जीव वाचविण्याची प्रक्रिया आहे आणि जीव वाचवणे नक्कीच सामान्य गोष्ट नाही! ही बाब नागरिकांच्या लक्षात आणून देऊन स्वैच्छिक रक्तदान मोहीम राबविणे महत्त्वाचे ठरते.

आपल्या शरीराला जिवंत ठेवणाऱ्या घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे रक्त...!

रक्त हे शरीराचा अविभाज्य घटक असुन संपूर्ण मासपेशींना तसेच अवयवांना पोषक व प्राणवायू(ऑक्सिजन)देण्याचे कार्य रक्त करत असते.

स्वैच्छिक रक्तदान...वाचवी रुग्णांचे प्राण...विषयी जनजागृती:

१)रक्त हे फार काळ टिकवून अथवा साठवता येत नसल्यामुळे सतत रक्तदानाद्वारे रक्ताची गरज पूर्ण होते.

२)"रक्तदान" थॅलेसेमिया, हिमोफिलिया ,ल्युकेमिया इ. रुग्णांसाठी "लाईफ लाईन" आहे .अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज भासते. अशा रुग्णांना कधीही रक्ताची कमतरता भासू नये म्हणून स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे.....!

३)अतिदक्षता,प्रसुती,अपघात,
रक्तक्षय,अतिरक्तस्त्राव इ.आदी अशा रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी तातडीने रक्ताची आवश्यकता भासते.अशा रुग्णांसाठी स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे....!

४)आपल्या रक्तदान केलेल्या एका युनिट मधून रक्त व रक्तघटक वेगळे केले जातात.(तांबड्या पेशी, पांढऱ्या पेशी(प्लाझमा),रक्तबिंबीका (प्लेटलेट्स)इ.अशाप्रकारे आपल्या रक्तदानाने एक ते तीन रुग्णांचे प्राण आपण वाचवू शकता.

५) माझ्या रक्तदानाने निश्चितच गरजूंना रक्त पुरवठा झाल्याचे समाधान मिळणार..यासाठी स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे.!

६) रक्तदानाने.... शरीरातील रक्तदाब,कोलेस्टेरॉलचे प्रमाण योग्य नियंत्रण राहते.

७) समाजाचे ऋण फेडायची ही एक संधी रक्तदानामुळे मिळते..

८) नवीन रक्त तयार करण्याची क्षमता वाढते.

९)रक्तदान केल्यानंतर चोवीस तास ते सात दिवसात नैसर्गिकरित्या झिज भरून निघते.

१०)रक्तदान केल्यानंतर नवीन पेशी तयार होण्यासाठी नवचेतना निर्माण होते.

११)शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार रक्तदान प्रक्रियेत रक्तदानावेळी सुरक्षिततचे काटेकोरपणे पालन केले जाते.

१२)समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निःस्वार्थीपणे,
समाजहितासाठी, राष्ट्रसेवा म्हणून रक्तदान महत्त्वाचे आहे.

१३)निरोगी व्यक्ती दर तीन महिन्यांनी रक्तदान करु शकता.

यासाठी शासनस्तरावरुन समाजात स्वैच्छिक रक्तदानाबाबत सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी विविध उपक्रम, अभियान, जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात. सोबतच स्वैच्छिक रक्तदानाविषयी नागरीकांमध्ये सामाजिक बांधिलकी, समाजहित, राष्ट्रीयतेची भावना, युवा शक्तीमध्ये रक्तदानाविषयी गैरसमज दूर करून स्वैच्छिक रक्तदानाविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे, सुदृढ मानसिक आरोग्य, स्वैच्छिक रक्तदानाबाबत समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

यासाठी केंद्र सरकार अंतर्गत राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य विभाग,महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सो.,राज्य रक्त संक्रमण परिषद, धर्मदाय, सांस्कृतिक/सामाजिक सेवाभावी संस्था , विविध संघटना इ.मार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वैच्छिक रक्तदान शिबिरे तसेच जनजागृती पर कार्यक्रम आयोजित केले जातात. भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वैच्छिक रक्तदानाचे प्रमाण कमी आहे. पण शासन स्तरावर जनजागृती मोहीम वेळोवेळी राबविण्यात येते.

आपल्या रक्तदानामुळे, आपण अनेक लोकांचे जीवन वाचवू शकतो. स्वैच्छिक रक्तदान हे सामाजिक कार्याबरोबर कर्तव्य देखील आहे. जे आपल्याला आपल्या समाजात जोपासण्याची गरज आहे.

"रक्तदाता" हा रुग्णांसाठी नेहमी आशेचा किरण ठरला आहे. "रक्त" हे कृत्रिमरीत्या तयार करता येत नाही तर ते तयार होते तुमच्या आमच्या मानवी शरीरात.यासाठी "रक्तदाता" म्हणून आपण स्वतःहून स्वैच्छिक रक्तदान करणे महत्त्वाचे ठरते. यासाठी शासनाच्या घोष वाक्यानूसार

"करुया स्वैच्छिक रक्तदान... गरजूं रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी ... आशा जागवू... या...!

यासाठी सामाजिक बांधिलकी ठेऊन एकत्रितपणे स्वैच्छिक रक्तदान मोहीम राबवून.... रुग्णांचे प्राण वाचवू या..!

या लेखाव्दारे समाजात तसेच युवाशक्तीमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी यामागे एवढाच उद्देश.

रक्त देऊ या..आशा जागवू या.
: एकत्रितपणे जीव वाचवू या...।
हेमकांत सोनार,
रक्तपेढी तंत्रज्ञ,रक्तकेंद्र, अलिबाग-रायगड.
९५११८८२५७८.

---

# मुखेड येवती येथून आषाढी पायीं दिंडीचे १५ जुन रोजी प्रस्थान.

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड - येवती येथून आषाढी पायीं दिंडीचे १५ जुन रोजी प्रस्थान. श्री संत जगद्गुरू तुकाराम महाराज पायीं दिंडीचे दरवर्षी प्रमाणे यंदाही दि. १५ जुन २०२५ रोजी श्री सद्गुरू नराशाम महाराज मठ संस्थान येवती येथून सकाळी ठीक ९ वाजता प्रस्थान होणार असून विशेष बाब म्हणजे यंदा या पायीं दिंडीला रथाच्या पाठीमागे नव्याने ३८४ दिंडी क्रमांक मिळाल्याने दि. १५ जुनला सकाळी दिंडीच्या फलकाचे अनावरण श्री सद्गुरू नराशाम महाराज यांच्या हस्ते पार पडल्यानंतर लगेचच वाजत गाजत पायीं दिंडीचे देहू कडे प्रस्थान होणार असल्याचे दिंडी चालक - ह.भ.प.बाबु महाराज घुमावार यांनी प्रसारमाध्यमांना कळविले आहे. हि पायीं दिंडी येवती येथून वाहनाने श्री शिखर शिंगणापूर करून श्रीक्षेत्र आळंदीचे दर्शन घेऊन दि. १७ जुन ला देहू मुक्कामी जाणार आहे. दि. १८ जुनला देहू येथून पंढरपूर कडे पायीं दिंडीचे प्रस्थान होणार आहे. देहूकडून - आकुर्डीला दि. १९ जुनला जाणार असून पुढे पुणे, लोणी काळभोर, यवत, वरवंट, उंडवडी गवळयाची, बारामती,सणसर, निमगाव केतकी, इंदापूर,बागल फाटा, आकलुज, बोरगाव, पिराची कुरोली,अशा प्रकारे वाकरी करून दि. ४ जुलै रोजी पंढरपूर येथे आगमन होईल. तरी देहु ते पंढरपूर आषाढी पायीं दिंडीत सहभागी होणाऱ्यांना कुठल्याही भाविक भक्तांना व्यक्तीत सुविधा मिळणार नाहीत. प्रवासात वित्त किंवा जीवीत हानी झाल्यास दिंडी चालक जबाबदार राहणार नाही. पायीं दिंडीत येताना आपले मौल्यवान वस्तू अनू नये अनल्यानंतर जर चोरी किंवा घाळ झाल्यास स्वतः जबाबदार राहाल असे आवाहन पायीं वारी दिंडी चालक - ह.भ.प. बाबू महाराज घुमावार यांनी केले आहे.




---

# पत्रकार जिद्देवार यांना मारहाण करणाऱ्या आरोपींच्या मोबाईलचे सीडीआर काढून त्यांस सहकार्य करणाऱ्यांना सहआरोपी करा...

## प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख दत्ता पंडीतराव देशमुख यांनी केली निवेदनाद्वारे मागणी

दैनिक युवक आधार
ता.प्रतिनीधी/ माधव काईतवाड बोरगडीकर
हिमायतनगर

नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील विरसनी येथे वृत्तसंकल करण्यासाठी गेलेले डिजिटल मीडिया परिषदेचे पत्रकार गजानन जिद्देवार यांना मारहाण करून दादागिरी करणाऱ्या रेती माफियाला तात्काळ अटक करण्यात यावी. आणि त्यांचे भ्रमणध्वनी वरील कॉल डिटेलचे CDR काढुन त्यांना सहकार्य केलेल्या सर्वांना सहआरोपी करण्यात यावे. अशी मागणी एका निवेदनाद्वारे प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख दत्ता पंडीतराव देशमुख यांनी केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे कि, आष्टी ता. हदगांव येथील पत्रकार गजानन जिद्देवार यांचेवर हिमायतनगर तालुक्यातील विरसनी येथील वाळु माफीयांनी जीवघेणा हल्ला केला आहे. हि बाब लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे मनोधैर्य, हिम्मत खचवनारी निंदनीय घटना आहे. यातील आरोपी असलेल्याने राजकीय पदाचा गैरवापर करून महसूल अधिकारी यांना हाताशी धरून शासनाच्या गौण खनिजाची चोरी करून साठेबाजी केली होती. हा प्रकार पत्रकार जिद्देवार यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी विरसनी, कामारी, पिंपरी परिसरातील अवैद्य रेती साठे जप्त करून त्या साठ्यातील रेती गोरगरीब घरकुल लाभार्थी यांना शासनाच्या धोरणानुसार मोफत वाटप करण्याची मागणी केली होती. त्यांच्या तक्रारीची दाखल घेऊन महसूलच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार यांनी रेती साठे जप्त करून त्याचा लिलाव आणि घरकुल धारकांना वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याची माहिती मिळाल्यावरून आष्टी ता. हदगांव येथील पत्रकार गजानन जिद्देवार हे वृत्तसंकलन करण्यासाठी विरसनी येथे गेले होते. यावेळी त्यांनी ते अवैद्य रेती साठ्याचे फोटो व व्हिडीओ फुटेज घेत असताना आरोपी शेख अफरोज, सोनू देवसरकर आणि त्याचे साथीदार यांनी संगनमत करून रेतीसाठ्याची तक्रार देणारा तूच पत्रकार आहेस का..? आमच्या तालुक्यात येऊन शहाणपणा करतो का असे म्हणत लाथा बुकय्या, लाठ्या काठ्याने बेदम मारहाण केली. तसेच गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून घेत ट्रैक्टर अंगावर आणून जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच जिद्देवार यांचे दोन मोबाईल फोडून नुकसान केले होते. यावरून पोलिसांनी गुन्हा दखल केला असला तरी अद्याप त्या रेतीमाफिया आरोपीना अटक न करता अटक पूर्व जामिनासाठी मोकाट सोडले आहे. त्यामुळे रेतीमाफिया आरोपी यांना राजकीय नेत्यांचे आणि पोलिसांचे अभय मिळत असल्याचे दिसून येत आहे. रेती माफिया आरोपी काहीं लोकाच्या संपर्कात राहुन रेती साठे करणे याबरोबर तक्रार करणाऱ्या पत्रकारास मारण्याचा कट रचत होते. तेंव्हा आरोपींच्या मोबाईलचे CDR काढून संबंधीताचा गुन्ह्यात समावेश करुन त्यांना सहकार्य करणार्यांना सहआरोपी करावे. अन्यथा पत्रकारासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रहारचे जिल्हाप्रमुख विठ्ठलराव कल्याणकर (देशमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका प्रमुख दत्ता पंडीतराव देशमुख यांनी दिला आहे. त्यांनी या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी नांदेड, जिल्हा पोलीस अधिक्षक नांदेड, तहसीलदार हिमायतनगर यांना दिल्या आहेत.

---

# पाऊस

सर सर सरी पाऊस पडतोय रे
रिमझिम रिमझिम नाद करतोय रे ।।

काळे काळे ढग गगनात आले
गडगड ढग वाजायला लागले
वीजांचा नाच सुरू झालाय रे
सर सर सरी पाऊस पडतोय रे ।।१।।

उनाड वारा सू सू वाहतोय पानात
टपटप गारा पडतात अंगणात
टपोऱ्या शुभ्र गारा वेचूया चला रे
सर सर सरी पाऊस पडतोय रे ।।२ ।।

बिजलीचा चमचमाट देखणा दिसतो
मयूर तालात पिसारा छान फुलवतो
ढगांचा नाच आपण पाहूया चला रे
सर सर सरी पाऊस आला रे ।।३।।

पाऊस रानाला ओलेचिंब करतो
धरणीला हिरवा शालू हो नेसवतो
सजलेली धरती पाहूया चला रे
सर सर सरी पाऊस आला रे ।।४ ।।

पत्र्यावरती टिपरीचा नाद गुंजतो
कौलावरती ताशांचा आवाज होतो
पावसाचा सुरेल नाद ऐकुया चला रे
सर सर सरी पाऊस आला रे।।५ ।।

नील आसमंत काळ्या मेघांनी भरला
पावसाने मनवाला आनंद खूप जाहला
साऱ्यांची खुशी आपण पाहुया चला रे
सर सर सरी पाऊस आला रे ।।६।।

वसुधा नाईक,पुणे

---

# अभिनव प्रतिष्ठानच्या वतीने "अभिनव गौरव पर्यावरण संवर्धन पुरस्काराने"वन परीक्षेत्र अधिकारी एस. बी. तांबे सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सामाजिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात राज्यभर कार्य करणाऱ्या सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने आज सूर्य किरण अर्बन बँकेच्या कार्यालयात छोटे खाणी संपन्न झालेल्या कार्यक्रमात सिल्लोड येथील सामाजिक वनिकरण विभागाचे कर्तव्यदक्ष वन परीक्षेत्र अधिकारी शेषराव बी. तांबे यांना सिल्लोड तालुक्यात राबविलेल्या वृक्षारोपणाच्या कार्यासाठी "अभिनव गौरव पर्यावरण संवर्धन पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष, व सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक किरण पाटील पवार यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सन्मान पत्र, ट्रॉफी असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तांबे यांनी सेवाकाळात एक लाखाहून अधिक वृक्ष लागवड करून ती रोपं जगवली व अनेक ठिकाणी घनवण उभी राहिली. एक वृक्ष माँ के नाम, एक विद्यार्थी -एक झाड, पंचायतन वन, गाव तेथे वड,कन्या वृक्ष योजना व महत्वाचे म्हणजे शाळा तेथे "राज्य पुष्प वृक्ष -जारूळ / तामन रोपणाची राज्यास दिशादायी योजना सर्वप्रथम व एकमेव उपक्रम राबविनाऱ्या अभिनव प्रतिष्ठानच्या डॉ. संतोष पाटील यांना शंभर हुन अधिक शाळेत रोपणास सहयोग दिला आहे.तांबे यांना याआधी महाराष्ट्र शासनाने 2017 मध्ये त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुवर्ण पदक देवून सन्मानित केले आहे. सिल्लोड येथे तांबे यांच्या स्थानी नव्याने वन परीक्षेत्र अधिकारी ( सामाजिक) म्हणून रुजू झालेले ए. टी. पाटील यांचा हि कदंब रोपं देवून सत्कार संस्थे तर्फे करण्यात आला. यावेळी डॉ. संतोष पाटील, सूर्यकिरण अर्बन बँकेचे सर व्यवस्थापक विजय चव्हाण, दिपक पाटील,वनविभागाचे एस जी गाडेकर, पूजा राजपूत,व्ही. बी. पाटील, कारभारी गोडसे, आर. एल. भडके, जनार्धन चाथे,गणेश परदेशी,प्रमोद शेंडगे आदीसह अभिनव प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.



---

# चिपळूण च्या अपर्णा महाडिक तर मंडणगड च्या रोशनी राजेंद्र सोनगरे यांना अवकाशातील शेवटच उड्डाण

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी प्रतिनिधी**
**योगेश सुतार**




अहमदाबाद येथे एअर इडिया कंपनीच्या विमाण अपघातात रत्नागिरी जिल्ह्यातील दोन तरुणीना आपला जीव गमवावा लागला. या अपघातातून आकाशात झे पावलेल्या एक जबाबदार आणि कर्तव्यनिष्ठ कन्या हरपल्या. अपर्णा महाडिक याचे पती ही एअर इंडिया कंपनी मध्ये कार्यरत आहेत. अपर्णा महाडिक या चिपळूण धामेली भोजनेवाडी मधील सुनबाई आहेत तर रोशनी राजेंद्र सोनगरे या मंडणगड मधील बुरी गावच्या रहिवासी असुन याच्या अपघाताची बातमी कळताच दोन्ही कुटुंबासह गावावरती शोकाकळ पसरली आहे .

मंडणगड बुरी तर चिपळूण सारख्या धामेली गावातुन जाऊन एअर इंडिया सारख्या मोठ्या कंपनी मध्ये नोकरी करण्याचे स्वप्न अखेर सत्यात उतरले पण परंतु नियतीच्या मणात मणात काही वेगळच असाव आणि कक्षाण होत्याच नव्हत झाल.

---

# छत्रपति साखर कारखान्याच काम नियोजनबद्द सुरु

## तोडणी वाहतूकीचे करार करण्यास केली सुरवात

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

भवानीनगर (ता. इंदापूर) येथील श्री छत्रपति सहकारी साखर कारखान्यात हंगाम २०२५-२०२६ करीता ऊस तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ दिनांक १२/६/२०२५ रोजी कारखान्याचे अध्यक्ष, श्री.पृथ्वीराज बापू जाचक व उपाध्यक्ष, श्री.कैलास गावडे यांचे हस्ते विधिवतपणे पुजा करून करणेत आला. येत्या गळीत हंगामाकरिता कारखान्याचे कार्यक्षेत्रात अंदाजे ८ लाख मे.टन ऊस गळितास उपलब्ध आहे व कार्यक्षेत्राबाहेरील गेटकेनचा ऊस गळितास घेऊन १२ लाख मे.टन ऊस गाळप करण्याचे संचालक मंडळाने ठरविले आहे.त्या दृष्टीने ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा भरती करणेचे नियोजन केले आहे.त्याकरिता ॲडव्हान्स व बिगर ॲडव्हान्स मधील एकूण ३५० ट्रॅक्टरचे, ९०० बैलगाडीचे, ६०० ट्रॅक्टरगाडीचे व १० केन हार्वेस्टरचे करार करणेत येणार आहेत.करारास प्रारंभ करणेपूर्वी कारखान्याने मागील हंगामातील ऊस तोडणी वाहतुकीची बिले,कमिशन,डिपॉझिट व वाटखर्ची इत्यादीचे पेमेंट कंत्राटदारांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहे.तसेच येत्या हंगामाकरिता करार करणाऱ्या कंत्राटदारांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना ॲडव्हान्सच्या पहिल्या हप्त्याचे वाटप करणेत येत आहे. तसेच सध्या कारखान्यातील मशिनरी ओव्हरहॉलिंग व रिपेअरिंगची कामे चालू असून सदरची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करून माहे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात दोन्ही प्लॅन्ट गाळपासाठी सज्ज ठेवण्यात येणार आहेत.येत्या हंगामाकरिता असलेली उसाची उपलब्धता विचारात घेता दोन्ही प्लॅन्ट पूर्ण क्षमतेने चालविणेत येणार आहेत. या वर्षी कारखान्याचे कार्यक्षेत्रात पावसाने चांगली सुरुवात केली असलेने उसाच्या उपलब्धतेत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. सद्यःस्थितीत साखर कारखानदारी आर्थिक अडचणीतून मार्गक्रमण करीत असून या अडचणीतून कारखाना बाहेर पडणेसाठी सभासदांनी त्यांचा ऊस आपल्याच कारखान्यास गळितास देऊन सहकार्य करावे.तसेच ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार यांनी कारखान्याकडे करार करून गळीत हंगाम यशस्वीरीत्या पार पाडणेसाठी सहकार्य करावे,असे आवाहन या प्रसंगी कारखान्याचे अध्यक्ष,श्री.पृथ्वीराज बापू जाचक यांनी केले. या कार्यक्रमास संचालक श्री. शिवाजी निंबाळकर, श्री.संतोष मासाळ,श्री. निलेश टिळेकर,श्री.सतिश देवकाते, श्री. मंथन कांबळे,कार्यकारी संचालक, श्री. अशोक जाधव, मुख्य शेतकी अधिकारी, श्री.जालिंदर शिंदे व बहुसंख्य ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार उपस्थित होते.



**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# झोपलेल्या इसमांचे मोबाईल चोरणारा अटकेत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील साईकृपा धाब्याच्या समोर सर्व्हिस रोडवर ट्रक मध्ये झोपलेल्या इसमाच्या मोबाईलची चोरी तसेच टायर पंम्चर काढणारे दुकानात झोपलेल्या दोघांचे मोबाईल चोरणाऱ्या गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे  विशाल कुमकर ( वय ३३ ) हे ट्रक मध्ये झोपलेले असताना कोणी तरी अज्ञात चोरट्याने त्याच्या खिशातील ८ ,००० रुपये किमतीचा विवो कंपनीचा फोन चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती . तसेच टायर पंम्चर काढणारे दुकानात झोपलेल्या दोघांचे मोबाईल सुद्धा चोरीस गेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती . त्यानुसार वपोनी नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोनी प्रकाश पवार , पो. हवा अमोल पाटील ,विशाल दुधे , महेश पाटील ,परेश बोरशे, किरण कराड , संदेश म्हात्रे आदींच्या पथकाने आरोपी तोहिद ताजुद्दीन शेख ( वय २१ ) याला ताब्यात घेतले असून त्याचा सहकारी पसार झाला आहे . त्याचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत .

## मोटारसायकलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

पनवेल रेल्वेस्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. राजु कृष्णा रेड्डी यांनी त्यांची ४०,००० /- किमतीची एम एच ४६ सी ४००५ ही मोटार सायकल पनवेल रेल्वेस्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवली असता अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जेष्ठ नागरिक महिला बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**

६२ वर्षीय मंगल लक्ष्मण शिंगारे या विचुंबे येथील घरातून कोणाला काहीही न सांगता निघून गेले आहेत. मात्र त्या घरी परत न आल्याने त्या हरवली असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. या महिलेची उंची चार फूट, पाच इंच, रंग काळा सावळा, चेहरा चौकोनी आहे. केस काळे आणि पांढरे बारीक केलेले आहेत. समोरील दात अर्धवट तुटलेला असून डाव्या हातावर फुलांचे चित्र गोंदलेले आहे. या महिलेला मराठी भाषा बोलता येते. गेल्या काही दिवसांपासून या महिलेचे स्वास्थ्य बिघडलेले आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यस महिला पोलीस हवालदार एस. एस. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

**कै.बाबासाहेब एरंडे (तात्या) यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थांचा**

## सन्मानचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला,

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

कळंबोली, सेक्टर १२ येथील कचराकुंडीमध्ये गोमांस सापडल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत समाजकंटकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाने कळंबोली पोलिसांकडे केली आहे. कळंबोली, सेक्टर १२ येथे कचराकुंडीमध्ये कत्तल केलेल्या गो मांसाचे तुकडे सापडून आले आहेत. या प्रकाराची माहिती मिळताच भारतीय जनता पार्टी रायगड भटके विमुक्त आघाडी रायगड जिल्हा अधक्ष बबन बारगजे यांनी या घटनेचा निषेध व्यक्त करत ज्या समाजकंटकांनी हा प्रकार केला आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी कळंबोली पोलीस ठाण्यात केली आहे.या वेळी सुभाष फड, महेश बारगजे, महेश माने, दिनेश तिडके, प्रतीक झाडे, राहुल चाटे, ज्ञानेश्वर उगलमुगले. परमेश्वर बारगजे, गणेश पिसाळ, मनिष भोईर आदी उपस्थित होते-

## सुरक्षा रक्षकाच्या केबिनची तोडफोड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

: तळोजामधील काही टवाळखोरांनी सेक्टर-१० मधील मैदानातील सुरक्षा रक्षक केबिन फोडले आणि खिडक्यांच्या काचा मैदान, पदपथावर टाकण्यात आल्या आहेत.  सिडकोने तळोजा सेक्टर-१० मध्ये खेळाचे मैदान विकसित करून पनवेल पालिकेकडे हस्तातंरित केले आहे, मात्र पनवेल पालिकेकडून मैदानाकडे दुर्लक्ष केले जात असून, मैदानातील खेळणी गायब झाली आहेत. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या उद्यान विभागाकडून खारघर आणि तळोजामधील उद्यान आणि मैदानाच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करून त्यासाठी केबिन उभारली आहे, मात्र ही केबिनची काही टवाळखोरांनी बॅट आणि दगडाने केबिन फोडली आहे. केबिनच्या खिडक्यांच्या काचा मैदान आणि पदपथावर टाकल्यामुळे मुलांना दुखापत होऊ शकते.

## वॉर्डबॉयचा अपघाती मृत्यू

दैनिक युवक आधार
पनवेल ( वार्ताहर )

: मैदानाशेजारी रस्त्यावर पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय विभागात कामावर जाणा-या एका वॉर्डबॉयचा अपघाती मृत्यू झाला. नेमका अपघात कशामुळे झाला याचा शोध खारघर पोलीस घेत आहेत.  या अपघातामधील मृत वॉर्डबॉयचे नाव राहुल रमेश उलवेकर (वय ३४) असे आहे. उलवेकर हे नावडे गावात राहत होते. मागील अनेक महिन्यांपासून ते महापालिकेच्या दवाखान्यात वॉर्डबॉयचे काम करत होता. सकाळी राहुल हे नावडे येथून दुचाकीवरुन महापालिकेच्या ओवे गावातील वैद्यकीय नागरी आरोग्य केंद्रावर जात असताना त्यांचा अपघात झाला. अपघाताचे नेमके कारण पोलिसांना समजू शकले नाही. रमेश यांची दुचाकी अचानक फरफटत गेली.यामध्ये राहुल यांच्या डोक्यावर जबर मार लागला. याच रस्त्याने जाणाऱ्या  एका रिक्षाचालकाने मदत करुन त्यांना रुग्णालयात दाखल केले. जखमी अवस्थेत राहुल यांना मेडिकव्हर या रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतू तेथील डॉक्टरांनी तपासल्यावर राहुल यांना मृत घोषित केले.

# अपोलो नवी मुंबईत सुरु होणार 'इन्स्टिट्यूट ऑफ क्लिनिकल ओबेसिटी अँड मेटाबोलिजम'

### लठ्ठपणा अनेक आजाराचे मूळ - डॉ संजय खरे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर** स्थूलपणा हे अनेक आजारांचे प्रमुख कारण आहे. हृदयाचे आजार, मधुमेह आणि काही प्रकारचे कॅन्सर स्थूलपणामुळे होतात. अनेक गंभीर गुंतागुंतीच्या समस्या शरीरात निर्माण होतात. त्यामुळे स्थूलपणावर उपाय करणे हे वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी नव्हे तर प्राणघातक आजारांना आळा घालण्यासाठी महत्त्वाचे आहे. अशी माहिती डॉ संजय खरे यांनी जागतिक लठ्ठपणा दिनाच्या पार्श्वभूमीवर दिली.  मुलांमध्ये स्थूलपणा वाढत आहे, ही अजूनच चिंताजनक बाब आहे. भारतामध्ये ५ ते १९ वर्षे वयाची जवळपास १२.५ मिलियन मुले २०२२ मध्ये स्थूलपणाने ग्रस्तस्त होती. ही आकडेवारी जगात सर्वात जास्त आहे आणि १९९० पासून यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. स्थूलपणा भारतातील शहरी आणि निम-शहरी भागांमध्ये वाढत असलेली एक साथ




आहे असे अपोलो हॉस्पिटल्सचे अरुणेश पुनेथा यांनी सांगितले. आहार तज्ञ, मनोवैज्ञानिक, फिजिओथेरपिस्ट आणि वेलनेस विशेषज्ञ यांनी सुसज्ज असणारे अपोलोचे क्लिनिक वजन कमी करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहे. प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, साखर मिसळलेली कोल्ड्रिंक्स यांचा वाढता खप, मोबाईल टीव्ही स्क्रीनवर खूप जास्त वेळ घालवणे आणि शारीरिक हालचाली खूपच कमी करणे ही या समस्येची प्रमुख कारणे आहेत असे

# कस्टम अधिकाऱ्यास मारहाण करून लुटले ; आरोपीं जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**उलवे नोड वार्ताहर**

उलव्यात कस्टम अधिकाऱ्याची भर रस्त्यात गाडी अडवून कस्टम अधिकाऱ्यास  लोखंडी रॉड, बॅट ब लाकडी स्टम्पच्या सहाय्याने बेदम मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळीसह पर्समधील इतर ऐवज असा एकूण सव्वा लाख रूपयांचा ऐवज लुटून नेल्याची गंभीर घटना ३१ मे रोजी घडली होती.या प्रकरणी कस्टम अधिकारी विनय जितेंद्र कुमार यांनी दिलेल्या माहिती नुसार बारमालका सह पाच ते सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कस्टमचे अधिकारी असलेले विनय कुमार हे उलवे येथे घरी जात असताना त्यांना वाशी येथील एसबी बारचे मॅनेजर
सुधीर शेट्टी, करीम मुल्ला आणि ऑटो चालक रणजित सिंग यांनी  भर रस्त्यात विनयकुमार यांची गाडी अडविली व त्यांना लोखंडी रॉड, बॅट, स्टम्प आणि लाकडाने जबरी मारहाण केली व त्यांच्या गळ्यातील ७६ हजार रूपयांची २२ ग्रॅम वजनाची सोनसाखळी २५ हजार रूपयांचा आयफोन व आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, बँकेचे डेबीट कार्ड असे साहित्य असलेले महागडे लेदरचे पॉकेट असा एकूण १ लाख १५ हजार रूपयांचा ऐवज घेवून घटनास्थळाहून पलायन
केले. या मारहाणीत जखमी झालेले कस्टम अधिकारी विनय कुमार यांनी अपोलो इस्पितळामध्ये स्वतःवर उपचार केले.  त्यांच्या तक्रारीवरून उलवे पोलीस ठाण्यात कलम ३२४(१), १२६(२), ३२४(६) अंतर्गत दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यातील अटक असलेले आरोपी १) सुधीर शेट्टी, ३६ वर्षे २) करिमुल्ला मालीवाले ,३६ वर्षे दोन्ही उलवे यांचे निवासस्थान ३.) रणजित वीरेंद्र सिंग २६ कोपरी, वाशी यांचे निवासस्थान येथील असून सदर प्रकरणी गुन्ह्यातील तिन्ही आरोपीं कडून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस ( अजित पवार ) पक्षाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनतेची विकास कामे - वसीम बुऱ्हानी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कडून जनतेच्या विकासाची मोठ्या प्रमाणात कामे केली जात आहेत. या सरकार कडून अल्पसंख्यकासाठी अनेक योजना आहेत या योजनेतून अनेक जण आपला विकास करू शकतात. आपल्या पायावर उभे राहू शकतात . तेव्हा त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचवा असे कळकळीचे आवाहन अल्पसंख्यक आयोग सदस्य वसीम बुऱ्हानी कार्यकर्त्यांना केले.




पनवेल जिल्हा अल्पसंख्यक अध्यक्ष हबीब फजल शेख आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस रायगड जिल्हा अध्यक्ष महादेव पाटील यांच्या प्रयत्नाने उभारण्यात आलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्यक जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन अल्पसंख्यक आयोग सदस्य वसीम बुऱ्हानी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते कळंबोली येथे बोलत होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून जनतेची मोठ्या प्रमाणात विकास कामे होत आहेत. कोणाला काही अडचणी येत असेल, कामे होत नसतील तर त्यांनी माझ्याकडे या किंवा हबीब शेख, महादेव पाटील यांना सांगा आपली कामे केली जातील. या सरकार कडून अल्पसंख्यकासाठी अनेक योजना आहेत त्याचा लाभ घ्या. त्या लोकोपयोगी योजना आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनतेपर्यंत कशा पोहोचतील त्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करा असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी मोठया संख्येने नागरिकांनी राष्ट्रवादी अजित पवार पक्षात प्रवेश केला. त्यात महिलांची संख्या मोठी होती. यावेळी लाडक्या बहिणींना साड्यांचे वाटप वसीम बुऱ्हानी, हबीब शेख, महादेव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पनवेल जिल्हा अध्यक्ष महादेव पाटील, राष्ट्रवादीचे भीमसेन माळी, रायगड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख विकास करतमोड, मुनाफ पटेल, तिवारी, यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

# पैठण येथे प्रधान मंत्री आवास २.० योजना (शहर) विभाग आ.भुमरे यांच्या हस्ते शुभारंभ,

**दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा विभाग)**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण नगर परिषद हद्दीतील बेघर,गोरगरीब तसेच घरविरहीत असलेल्या सर्व नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना २.० शहरी विभाग अंतर्गत येणाऱ्या सर्व नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळणार आहे. या योजनेत पात्र असलेल्या नागरिकांना घरकुल बांधकामासाठी सरकारकडून २.५ ० लाखांचे अनुदान देण्यात येणार आहे तसेच योजनेपासून कोणताही नागरीक वंचित राहणार नाही  असे आश्वासनं या योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमा प्रसंगी आमदार विलास पा.भुमरे यांनी दिले.सदरिल कार्यक्रम पैठण नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विलास बापू भुमरे यांच्या हस्ते संपन्न झाला.



पैठण शहरातील बेघर गोरगरीब नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी विभाग) घरकुल योजनेची मोठी घोषणा करण्यात आली असून कोणताही पात्र नागरिक या योजनेपासून वंचित राहणार नसल्याचे सांगून सदरील योजना ही प्रभावीपने राबवत कुठलाही लाभार्थी वंचित राहिला नाही याची दक्षता घ्यावी असे सक्त निर्देश या योजनेच्या शुभारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमा दरम्यान आ.विलास बापू भुमरे यांनी दिले.यावेळी मा.नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, सुरज लोळगे मा. नगरसेवक अजित पगारे,जालिंदर आडसुळ, सुनील बलदवा,मा.उपाध्यक्ष सुचित्रा जोशी,संदिप आहेर,प्रशांत जगदाळे, कृष्णा मापारी, इश्वर दगडे,तुषार पाटील, सोमनाथ परळकर,भुषण कावसनकर,बाळासाहेब माने, पैठण नगरपरिषद उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे, धर्मराज उजगरे,अश्विन गोजरे,युवराज हलमारे, महेश गायकवाड,तुषार वाकळे यांच्यासह संकेत तांगडे,प्रशांत लांडे, गावंडे, चंद्रकांत पगारे,अशोक मगरे, रेशमा साबळे, निता ठोके, पंकज पवार, नवनाथ जगधने, राजु पगारे
अदिंसह नगर परिषद हद्दीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राला आली अवकळा छत गळती, शस्त्रक्रिया गृहात लाईट नाही, टॉयलेट ब्लॉकेज, दारे खिडक्या तुटक्या,

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**लिंबागणेश प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे मुख्य बाजारपेठ असलेल्या पंचक्रोशीतील १५ वाड्यांतील गोरगरीबांना आरोग्य सेवा पुरवणाऱ्या ३७ वर्षे पूर्ण झालेल्या लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अवकळा आली असुन पावसाळ्यात मुख्य इमारतीतील छत खराब झाल्याने गळती लागली असुन रूग्णांची तारांबळ उडत आहे.शस्त्रक्रिया गृहातील लाईट फिटींग नादुरुस्त आणि जीर्ण झालेली असुन नव्याने करण्याची आवश्यकता आहे. तसेच मुख्य इमारतीतील टायलेट ब्लॉकेज असुन रूग्णांची गैरसोय होत आहे.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचा विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होत असुन सिंगल फेजची जोडणी करण्यात यावी यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासस्थानांची दुरावस्था




झाली असून त्यांची दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी तसेच परिचर ५ मंजूर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन उर्वरित ३ रिक्त पदे भरण्यात यावीत.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना केली आहे.

**प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासस्थानांची दुरुस्ती आवश्यक :- डॉ.गणेश ढवळे**
प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना बांधण्यात आलेल्या निवासस्थानांची दुरावस्था झाली असुन पावसाळ्यात पाणी गळती होते. दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या आहेत.लाईट फिटींग ठिकठिकाणी उखडलेल्या अवस्थेत असुन नादुरुस्त आहे.टायलेट आउटलेट ब्लॉकेज असल्याने अधिकारी आणि कर्मचारी यांची गैरसोय होते. फरश्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. आणि निवासस्थानांची रंगरंगोटी करण्याची आवश्यकता आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५ मंजुर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन ३ परिचर पदे रिक्त असुन त्यामुळे मनुष्यबळावर मानसिक व शारीरिक ताण येत असुन रिक्त पदांची नियुक्ती करण्यात यावी. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

प्राथमिक मुख्य इमारतीतील आणि निवासस्थांनांच्या असुविधेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पत्रव्यवहार केला आहे.
लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि निवासस्थानी असणाऱ्या असुविधा जसे की पावसाळ्यात छताची गळती, शस्त्रक्रिया गृहात व ईतर ठिकाणी नादुरुस्त लाईट फिटींग, वारंवार खंडित विद्युत पुरवठा, टॉयलेट आउटलेट साठी सिमेंट टाकी नसल्यामुळे टॉयलेट ब्लॉक झालेला आहे. दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत असुन रंगरंगोटीची आवश्यकता असल्याचे पत्राद्वारे जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांना पत्रव्यवहार केला आहे.
**डॉ.रूपाली चिटकुलवार ( वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र लिंबागणेश)**

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानात जि. प.प्राथ. शाळा तोरणडोंगरी सुरगाण्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : राजेंद्र टोपले, सुरगाणा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा टप्पा क्र. 2 सन 2024-25 हे अभियान सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राबविण्यात आले.या अभियानास विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच माजी विद्यार्थी, पालक, पेसा कमिटी तोरणडोंगरी,ग्रामपंचायत अलंगुण व नागरिकांचा भरभरून प्रतिसाद लाभला.  या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याच्या मूल्यांकनात जि. प.प्राथ. शाळा तोरणडोंगरी ता. सुरगाणा शाळा तालुक्यात प्रथम आली असून राज्य शासनाचे शाळेला तीन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर झाले असल्याची माहिती मुख्याध्यापक दिगंबर चौधरी यांनी दिली.  स्पर्धेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या अभियानाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यात सुरगाणा तालुक्यातून जि. प.



प्राथ.शाळा तोरणडोंगरी या शाळेने प्रथम क्रमांक मिळविला या अभियानाच्या माध्यमातून जि. प. शाळा तोरणडोंगरी शाळेने अधिक प्रभावी विस्तार होण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा,शासन निर्णय अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्ता, विकसित करण्यासोबतच अध्ययन, अध्यापन, प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंड ओळख, अंगभूत कला- क्रीडा- सांस्कृतिक गुणांचा विकास, शासकीय योजनांचा लाभ, रेन वॉटर हार्वेस्टिंग, हॅन्ड वॉश स्टेशन, स्वच्छतागृह,पिण्याच्या पाण्याची सोय, परसबाग,वृक्षारोपण, डिजिटल वर्ग खोल्या, स्वच्छ सुंदर शालेय परिसर तसेच शाळा सर्व सोयी सुविधांनी युक्त व गुणवत्ताधारक शिक्षक वृंद अशा अनेक विविध घटकांचा व उद्दिष्टांवर काम करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे असे मुख्याध्यापक दिगंबर चौधरी यांनी सांगितले.  मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा क्र. 2 या  अभियानात शाळा प्रथम आल्याने पंचायत समिती सुरगाणा गटविकास अधिकारी श्री. जे. टी. सूर्यवंशी,गटशिक्षणाधिकारी श्रीमती अल्पा देशमुख,विस्तार अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री. धनंजय कोळी,विस्तार अधिकारी श्रीम.प्रमिला शेंडगे,केंद्रप्रमुख यशवंत चौधरी, उखाराम भोये यांनी शाळेचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. तसेच मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा क्रमांक 2 या उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता सरपंच हिरामण गावित, उपसरपंच देविदास जाधव, ग्रामविकास अधिकारी मोहन गायकवाड, मा. सरपंच तथा पेसा कमिटी अध्यक्ष आनंदा गावित, मा. सरपंच रघुनाथ भुसारे,पोलीस पाटील कैलास भुसारे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष भुसारे, कृष्णा दळवी,अशोक भुसारे, माता-पालक संघ, शिक्षक- पालक संघ, सर्व पालक, ग्रामस्थ,शिक्षक वृंद व सर्व विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक दिगंबर चौधरी,माजी मुख्याध्यापक काशिनाथ गावित,प्रभारी मुख्याध्यापक मनोहर भोये,शिक्षक पंडित गायवन, गणेश पाडवी,रामदास भोये,पुंडलिक चौधरी, श्रीकांत गवळी, मधुकर राऊत,यशवंत गावित, दुर्गा गुंबाडे यांनी आभार मानले आहे.

# रेवदंडा १९९४-९५ वि.म. पिळणकर कॉलेज गटाची चौथ्या वर्षीची गेट-टुगेदर सोहळा "निवांत" आनंदाची पर्वणी!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा येथील १९९४-९५ च्या वि.म. पिळणकर महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षीच्या विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर सोहळा नुकताच नागाव सोनार पेठ, हटाळे येथील "निवांत रिसॉर्ट" या निसर्गरम्य ठिकाणी अत्यंत उत्साहात आणि प्रेमळ वातावरणात संपन्न झाला. "आनंदाचे डोही आनंद तरंग" हे शब्द खऱ्या अर्थाने साजेसे ठरले, जेव्हा अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा जुन्या मित्रमैत्रिणींची



गळाभेट झाली, मनमोकळ्या गप्पा रंगल्या, आठवणींना उजाळा मिळाला आणि मैत्रीच्या नात्याची घट्ट वीण पुन्हा घट्ट झाली.या गेट-टुगेदरचे खास वैशिष्ट्य म्हणजे मित्रांबरोबरच मैत्रिणींची विशेष उपस्थिती जिची काळजीपूर्वक आणि आपुलकीने तयारी करण्यात आली होती. आपल्या संसार, जबाबदाऱ्या, धावपळ यामधून थोडा वेळ बाजूला ठेवून सर्व मैत्रिणींनी गेट-टुगेदरमध्ये सहभागी होणं हे एक वेगळं यशच ठरलं. या आठवणींना अधिक गोडवा मिळाला तो म्हणजे सदाने आणि त्याच्या संपूर्ण टीमने घेतलेली मेहनत. नियोजन, पाहुणचार, अन्न, संस्कृती, आणि वातावरण प्रत्येक गोष्टीतून हा कार्यक्रम खास आणि संस्मरणीय ठरला. उंबर आणणारा सदा आणि मोहन, गुलाबजाम घेऊन आलेली ज्योती, ताजी खजांची मजा घेऊन आलेला शैलेश आणि कुल्फीचा गोडवा घेऊन आलेली भारती – प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने योगदान दिलं, आणि त्या मुळे ही मैफल खऱ्या अर्थाने रंगली. मनापासून सत्कार, प्रेमळ शब्द, आणि निखळ हास्य यांनी भरलेला हा दिवस प्रत्येकाच्या आयुष्यात एक अमूल्य क्षण म्हणून कोरला गेला. काही जण म्हणत होते, "खूप वर्षांनी नाचायला मिळालं", तर काही जण म्हणाले, "माझ्या आयुष्यातला सगळ्यात सुंदर दिवस!"या गेट-टुगेदरमुळे एक गोष्ट ठळकपणे दिसून आली – मैत्रीचं नातं वय, काळ, आणि अंतर विसरतं पण आपुलकी मात्र अधिकच वाढवतं!शेवटी एकच सूर सगळ्यांच्या मनात घुमत होता  "पुन्हा लवकरच भेटूया आणि सदा, आता पुढच्या गेट-टुगेदरची तयारी सुरू कर!"

## नेतृत्वाचा आशीर्वाद

गावपाटीवर नवे वारे आले
*"देवाभाईंचे"तेज पुन्हा उजळले*
शरद पवारांचा वरदहस्त लाभला
*स्वप्नांना नवसंजीवनी मिळाला*

वाटचाल आमची
विश्वासाची छाया
सोबत आहेत घरतसाहेब
आणि त्यांची माया

उगवतोय हा दिवस
नव्या वर्षाच्या आशेचा
संपूर्ण आनंद जनतेच्या
*मनात आहे विश्वासाचा

कृषी बाजारा जवळ
ग्रामपंचायतीची शान
देवळोली गातं आज
आहे विजयाचा गान

*लेखन : अशोक ना.घरत. पनवेल.*
*(पत्रकार)*

# वाळू धोरणासंदर्भात सरपंचाचे उपोषण

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

राळेगाव-: घरकुल लाभार्थ्यांच्या नावाखाली वाळू तस्करांनी धुमाकूळ माजविला आहे. अधिकारी वाळू तस्करीवर जराही गंभीर दिसत नाहीत. खनिकर्म विभागही सुस्तावलेला आहे. त्यातच खऱ्या घरकुलाच्या लाभार्थ्यांना वाळू मिळत नसून तालुक्यात सर्वत्र सावळा गोंधळ सुरू असल्याचा आरोप पळसकुंडचे सरपंच वनिश घोसले यांनी केला असून प्रशासनाच्या निषेधार्थ त्यांनी बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले आहे. तालुक्यात वर्धा नदीपात्रातून वाळूतस्करी अव्याहतपणे सुरू आहे. वडकी, वाढोणाबाजार,धानोरा,रोहीणी यासह




अनेक भागात वाळूतस्करी सुरू आहे. यंदा वाळू धोरणाच्या विलंबामुळे एकही घाट लिलावात गेला नाही. त्याचा लाभ तालुक्यातील वाळू तस्करांनी उचलला. पूर्वीच्या एसडीओंनी धडाकेबाज कारवाया केल्या होत्या. मात्र त्यांच्या बदलीनंतर तालुक्यात पुन्हा वाळूतस्करी सुरू झाली. वास्तविक शासनाने घरकूल योजनेसाठी लाभार्थ्यांना वाळू देण्याचे धोरण आखले.त्यासाठी बीडीओ व तहसीलदारांनी लाभार्थ्यांची नावे निश्चित करून त्यांना वाहतूक पास द्यायची आहे.

**वाळू धोरणावरच आपला बहिष्कार**
घरकूल लाभार्थ्यांना वाळू मिळावी, यासाठी शासनाचे धोरण आहे. मात्र, या धोरणाच्या आडून महसूल व पोलिस विभागातील अधिकारी लाभार्थ्यांची कुचंबना करीत आहेत. वाळू तस्करांनी लाभार्थ्यांच्या नावाखाली मिळणाऱ्या वाहतूक पासवर वाळू तस्करीचा गोरखधंदा चालविला आहे. एकंदरीत सरपंच म्हणून आपण लाभार्थ्यांसाठी गेलो. मात्र, आपलाच अवमान करण्यात आला, असा आरोप पळसकुंडच्या सरपंच वनिश घोसले यांनी केला आहे. आपला वाळू धोरणावरच बहिष्कार असल्याचे त्यांनी सांगितले.

मात्र, या पासच्या आधारावर खुलेआम वाळू तस्करी केली जात आहे. घरकुलासाठी वाळू जात असल्याचे महसूलचे अधिकारी सांगत आहेत. दरम्यान, तालुक्यातील घरकुलचे काही लाभार्थी वाळूसाठी कोच्ची घाटावर गेले होते. मात्र, तेथे ट्रॅक्टर परत पाठविण्यात आले. त्यामुळे पळसकुंडचे सरपंच वनिश घोसले या घाटावर गेले. तेथील अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी रॉयल्टी बुक उपलब्ध नसल्याचे सांगितले. मात्र, लाभार्थ्यांनी रॉयल्टी बुक असूनसुद्धा आम्हाला परत पाठविल्याचे सरपंचांना सांगितले. अधिकाऱ्यांनी बुक लपवून ठेवल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला. दरम्यान, वडकीच्या ठाणेदारांनी यावेळी सरपंच घोसले यांनाच धमकावून अपमानित केल्याचा आरोपही सरपंच घोसले यांनी केला आहे.

## राष्ट्रीय लगोरी फाउंडर्स कप मध्ये बिहार संघाला प्रथम पारितोषिक..

### ( गोवा उपविजयी,तृतीय पारितोषिक महाराष्ट्र व महा. मुंबई) मुलींच्या गटामध्ये प्रथम पारितोषिक हरियाणा (द्वितीय क्रमांक बिहार,तृतीय क्रमांक झारखंड व गोवा)

**दैनिक युवक आधार**
उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक विनोद गायकवाड

नाशिक ;- ;लगोरी स्पोर्ट क्लब महाराष्ट्र व नाशिक स्पोर्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 18 वर्ष आतील लगोरी स्पोर्ट चॅम्पियनशिप नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात महाराष्ट्र लगोरी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाली या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अनिकेत तटकरे साहेब, ॲड. मनोज कुमार शिंदे सर, किरण पाटील, हेमंत पायर, अभिषेक लाड, सुभाष शिर्के आणि पवन सिंग ,रणधीर सिंग (बिहार), जयवीर डड्डी (हरियाणा), राजेश सर (कर्नाटक), खुशी सिंग (झारखंड), शुभदा सवाईकर मॅडम (अध्यक्ष, गोवा) आणि तनवेश सर (सचिव, गोवा)
हे उपस्थित होते. . लगोरी स्पोर्ट क्लबचे संस्थापक अध्यक्ष तुषार जाधव यांनी लगोरी खेळाचे नियम व माहिती विद्यार्थ्यांना सांगितली
या स्पर्धेसाठी भारतातून एकूण 18 संघाने सहभाग नोंदवला त्यामध्ये नव्याने सामील झालेले संघ कर्नाटका ,उत्तराखंड,
हे संघही उपस्थित होते. लगोरी खेळाचा अंतिम सामना गोवा
,विरुद्ध बिहार यांच्यात झाला बिहार संघाने उत्कृष्ट खेळ करत विजयश्री मिळाला तसेच गोवा संघाला उपविजेयी पदावर समाधान मानावे लागले , तृतीय क्रमांक महा.मुंबई व महाराष्ट्र
संघाला मिळाला . मुलींचा अंतिम सामना हरियाणा विरुद्ध बिहार यांच्यात झाला हरियाणा संघाने उत्कृष्ट खेळ करत विजयश्री मिळवला बिहार संघाला उपविजय पदावर समाधान मानावे लागले तृतीय क्रमांक झारखंड व गोवा यांनी मिळवल्याबद्दल यांचे राज्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लगोरी स्पोर्ट क्लबचे संस्थापक अध्यक्ष तुषार जाधव ,नाशिक संघटक विलास गायकवाड,राजेंद्र पाटील.......यांनी परिश्रम घेतले.




## कै.बाबासाहेब एरंडे (तात्या) यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थांचा सन्मानचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला,



**दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा विभाग)**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण तालुक्यातील ७४जळगाव येथील शिवसेनेचे पहिले शाखाप्रमुख तथा ७४जळगाव ग्रुप ग्रामपंचायत माजी उपसरपंच कै.बाबासाहेब कोंडीराम एरंडे(तात्या) यांच्या प्रथम स्मरणार्था पाचोड नगरीचे युवा सरपंच शिवराज भैया भुमरे यांच्या हस्ते दहावी व बारावी आणि विविध क्षेत्रात विशेष कामगीरी करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीं यांना सन्मानचिन्ह देवुन आई व वडीलांचा सत्कार करण्यात आला. व शिवसेना आणि युवा सेना या शाखेचे नुतनीकरण करण्यात आले.यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख काकासाहेब टेके,पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राम एरंडे,युवा सेनेचे ज्योतीराम पाटील,तालुकाप्रमुख विजय गायकवाड,अमोल वंजारे,नितीन वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.दहावी व बारावी परिक्षेत जास्तचे टक्केवारी गुण मिळवणारे आणि विविध क्षेत्रात विशेष कामगीरी करणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देवुन व आई व वडीलांना शाल घालुन सत्कार करण्यात आला.७४जळगाव व शाहापुरमानेगाव येथील शिवसेना व युवासेना या शाखेचेही नुतनीकरण करण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संत एकनाथ महाराज शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन आमोल एरंडे,उपसरपंच नितिन एरंडे,चेअरमन तथा अड सचिन एरंडे,व्हा.चेअरमन हरिभाऊ घेगडे,संचालक उध्दव एरंडे यांनी मेहनत घेतली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विठ्ठल मुळे यांनी तर आभारप्रदर्शन हरिभाऊ घेगडे यांनी केले.

## पावसाळा लागण्यापूर्वीच सिल्लोड ते पालोद महामार्गाचे तीन तेरा

### प्रशासनाचे दुर्लक्षः- खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सिल्लोड**
**योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील सिल्लोड ते पालोद रस्त्यावर पावसाळा सुरू होण्याअगोदरच जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांची गैरसोय होत आहे. त्यातच पावसाचे पाणी मोठ्या खड्ड्यात सतत असल्याने रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघात वाढले आहे. पावसाळ्यापूर्वीच रस्त्याची ही दुरावस्था असल्याने संबंधित प्रशासन व कंत्राटदार यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होत आहे.



सदर महामार्ग जगप्रसिद्ध अजिंठा लेणी व जळगाव जिल्ह्याला जोडणारा असल्याने या मार्गावर नियमित मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. मात्र रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने रस्त्याचे काम अर्धवट सोडल्याने पावसाळ्यापूर्वीच हा रस्ता अखेरची घटका मोजत आहे. तसेच खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने रात्री अप- रात्री येथे जड वाहन व दुचाकीस्वारांचा वारंवार अपघात होत आहे. तसेच खड्डेमय रस्त्यांमुळे प्रवाशांना मणक्याचे आजार जडले आहेत. संबंधित महामार्गाचे काम तातडीने हाती घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी. अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

**संबंधित विभाग व कंत्राटदाराचे महामार्गाकडे दुर्लक्ष**

सिल्लोड-पालोद महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची गर्दी असते. संबंधित महामार्ग जळगाव जिल्हा व जगप्रसिद्ध अजिंठा लेणी यांना जोडणारा असून, संबंधित कंत्राटदाराने या मार्गाचे काम अर्धवट सोडले आहे. परिणामी या रस्त्याची चाळणी झाली आहे. संबंधित कंत्राटदाराच्या मनमानी कारभाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे

## भडगाव तालुक्यात केळी पिकाचे लाखोंचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**विभागीय प्रतिनिधी,**
**उमेश पाटील**

भडगावः वादळी वारा मेघगर्जनेसह पावसाने जोरदार हजेरी लावली परंतु केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा पाऊस नुकसानदायक ठरला. भडगाव तालुक्यातील अनेक केळी उत्पादक शेतकऱ्यांचा तोंडी आलेला घास गेला. वादळी वाऱ्यामुळे केळीचे पीक जमीनदोस झाले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. अतिवृष्टी असेल किंवा अवकाळी पाऊस गारपीट वादळ वारा अशा नैसर्गिक आपत्तीत नेहमीच शेतकरी सापडलेला दिसतो. परिसरातील युवा केळी उत्पादक शेतकरी धिरेंद्र गौतम पाटील व इतर शेतकऱ्यांची प्रशासनाने नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करत आहेत.






शिरूरआनंतपाळ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरिक्षक गजानन अन्सापुरे यांची अमरावती शहर पोलीस स्टेशनला बदली झाल्याने त्यांना पोलीस निरिक्षक विठ्ठल दराडे यांच्या हस्ते सत्कार करुन निरोप देण्यात आला. यावेळी ठाण्यातील पोलीस कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.
( छायाचित्र दैनिक युवक आधार)

# माणिकनगरची श्री.सिद्धिविनायक संस्था शासनाच्या राज्य पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-**

तालुक्यातील माणिकनगर (भवन) येथील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री. सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस राज्य शासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.
माणिकनगर (भवन) ता. सिल्लोड येथील कला, क्रीडा,शैक्षणिक, सामाजिक, यासारख्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री.सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस राज्य शासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय



प्रावीण्य पुरस्कार या द्वितीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.हा पुरस्कार वितरण सोहळा मंगळवारी दुपारी
मुंबईतील नरिमन पॉइंट स्थित यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय सिरसाठ , मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड , रोहयो आणि फलोत्पादन मंत्री मा.ना.भरतशेठ गोगावले, आ. संतोष बांगर, आ.प्रशांत बंब, यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव सुनिल बोराडे , मुलींच्या वसतिगृहाच्या अधिक्षिका मनीषा बिडवे ,संस्थेचे उपाध्यक्ष संतोष बोराडे आणि कर्मचारी प्रतीनिधी विद्या छडिदार आदींनी रू. तीन लक्ष रुपयांचा धनादेश , स्मृतीचिन्ह ,महावस्त्र आणि मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.
या पुरस्कार सोहळ्यासाठी मिलिंद शिंदे , तुषार शिंदे , सचिन इंगळे , विलास फरकाडे , रवींद्र सहज , विठ्ठल छडीदार , नितीन वाघ , जनार्दन बोराडे ,सागर श्रीखंडे आदींसह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

फोटो कॅप्शन :
*माणिकनगर : ता. सिल्लोड येथील श्री.सिद्धिविनायक शिक्षण संस्थेस राज्य शासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्काराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

**२९ वर्षापासून विविध क्षेत्रात कार्यरत..**
महाराष्ट्र शासनाचा सन्मान प्राप्त श्री.सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था गेल्या वर्षापासून मुलींचे मोफत निवासी शिक्षणसह शिक्षण ,प्रशिक्षण , प्रबोधन , ग्रंथालयीन , संगणकीय आणि जनजागृती क्षेत्रात कार्यरत असून गेल्या दोन महिन्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या पथकाद्वारे संस्थेची सखोल चौकशी करून या पुरस्कारासाठी निवड केली हे विशेष.

# सरकारची बंदी झुगारत शेतकरी संघटनेचे खडकी येथे एचटिबीटी कापसाचे लागवड आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** तालुक्यातील खडकी येथे कृषी शास्त्रज्ञानांनी जि एम तंत्रज्ञाने तणरोधक कापूस बियाण्यांची निर्मिती केली, पण त्या बियाणांवर केंद्र सरकारने बंदी आणून शेतीत येणाऱ्या तंत्रज्ञानाचे वापरा पासून शेतकऱ्यांना वंचित ठेवत आहे, सरकारच्या आणी प्रशासनाच्या या कृतीचा निषेध म्हणून शेतकरी संघटनेचे वतीने दि १२ जून ला खडकी येथे श्री राजेन्द्र झोटींग यांचे शेतात एचटिबीटी कापूस लागवड आंदोलन करण्यात येत आहे, शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे आणी बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आणी देशातील इतर उद्योगांना तंत्रज्ञान वापरायचे जसे स्वातंत्र्य आहे, तसेच स्वातंत्र्य शेतकऱ्यांना मिळाल्या शिवाय शेतकरी शांत बसायच नाही. असे आवाहन शेतकरी संघटनेचे नेते माजी आमदार श्री ॲड वामनराव चटप यांनी व्यक्त केले.चर्चा सत्राचे मार्गदर्शन करतानी कृषी शास्त्रज्ञानांनी मोठ्या श्रमाने एचटिबीटी कापसाचे बियाणे संशोधीत केले. या बियाणांचे कापसावर तणनाशक फवारणीने



तणाचा नायनाट होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा खुरपणी साठी होणारा किमान १० ते १५ हजार रूपयांचा खर्च कमी होतो. हाच त्यांचा शेती धंद्यातील नफा आहे. या नफ्याच्या शिल्लकीतून तो आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करतो. आणी कर्जापोटी होणारी आत्महत्या थांबविण्यासाठी, सरकारने बंद्दी घातली असली तरी शेतकरी स्वअनुभवातून एचटिबीटी बियाणे खरेदी करतो. शेतकऱ्यांच्या घरावर, शेतात कृषी अधिकारी, पोलीस न्यायालयाचा सर्च वारंट न घेता धाडी टाकून शेतकऱ्यांवर अत्याचार करीत आहे, म्हणून हि धाड शेतकऱ्यांवरील प्राणघातक हल्ला समजून शेतकऱ्यांनी त्याचा प्रतीकार करावा,असे आवाहन शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री ललीतदादा बहाळे यांनी केले. या चर्चा सत्रात बोलतांनी स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री मधुसूदन हरणे यांनी १९ जुलै २०१९ चे संसदेचे अधिवेशनात खासदार श्री किर्ती वर्धन सिंह यांचे ४४४१ या अताराकिंत प्रश्ननाला लेखी उत्तर देतानी केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री बाबुल सुप्रीयो यांनी जिएम बियाणे असुरक्षित असल्याचा कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही असे स्पष्ट सांगितले. यावरून हे स्पष्ट दिसते की सरकारची हि बंदी त्यातून होणा-या धाडी हे सरकारची एक तर हुकूमशाही आहे किंवा परवानाधारक सिड कंपन्या,महागडे तणनाशक कंपन्या च्या खोकयां च्या दबावा मुळे शेतकऱ्यांना गुन्हेगार ठरवित आहे. या एचटिबीटी कापसाचे सिड उत्पादनाचे प्लांट पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणी केंद्रीय गृहमंत्री श्री अमीत शहा यांचे गृह राज्य असलेल्या गुजरात राज्यात आहे. हिंमत असेल राज्यातील अधिका-यांनी,पोलिसांनी धाडीच टाकायच्याच आहे तर तिथे टाकाव्या,राज्याचे मुख्यमंत्री आणी गृहमंत्री श्री देवेंद्र फडणवीसांनी शेतीत AI तंत्रज्ञान आणण्याचा निश्चय केला तो स्वागतार्ह आहे. पण त्यांच्याच राज्यात त्यांचेच अधिकारी, त्यांचेच पोलीस तंत्रज्ञान युक्त एचटिबीटी कापसाचे बियाणे वापरणा-या शेतकऱ्यांना गुन्हेगार ठरवित आहे. कृषी हा विषय राज्याचे सुचीत असल्याने मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या प्रशासनाला शेतकऱ्यांना जिएम बियाणांचा वापर करण्यास अडथळा आणू नये, असे निर्देश द्यावे. आणी केंद्र सरकारने जिएम तंत्रज्ञानाने तयार झालेल्या बियाणांवर घातलेली बंदी राज्यातून हटवावी, तरच मुख्यमंत्र्यांचा आणी त्यांच्या सरकारचा शेतीत AI तंत्रज्ञान आणण्याची घोषणा शेतकऱ्यांना खरी वाटेल, ती हिंमत राज्य सरकारने दाखवावी,नसेल तर शेतकरी ती हिंमत दाखवत तंत्रज्ञानाचा वापर जिएम बियाणे वापरून शेतीत करीत आहे, त्यांना किमान गुन्हेगार ठरवू नये, असे आवाहन केले.कार्यक्रमात तंत्रज्ञान आघाडी चे अध्यक्ष श्री मिलिंद दामले यांनी विचार मांडले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री विजय निवल यांनी केली. संचालन व आभारप्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजक यवतमाळ जिल्हा प्रमुख श्री राजेन्द्र झोटींग यांनी केले.कार्यक्रमाला युवा आघाडीचे माजी अध्यक्ष श्री सतीश दाणी, राजाभाऊ पुसदेकर, कृष्णराव भोंगाडे,जयंतराव बापट, दिनकरराव निसताने, दिपक आनंदवार, भास्करराव महाजन,चंद्रशेखर देशमुख, हिम्मतराव देशमुख,जितेंद्र कहुरके,सौ राजश्री झोटींग, सुमनबाई काळे, संगीता बचाटे, यशोदा खेवले, जयश्री तामगाडगे,पुनम पाटील, पार्वताबाई आत्राम,वर्षा जीवने,अक्षय महाजन, मधुकरराव कोवे, गजानन पारखी, गोपाल भोयर, गजानन ठाकरे,घर्षण गमे,प्रदीप भोयर, गजानन कोल्हे,भास्कर पाटील,रोहीत हरणे, नितीन भगत, हेमराज ईखार, खुशालराव हिवरकर, किसनराव गाढवे,बंडूजी येरगुडे,आणि जिल्हातील व गावातील असंख्य कार्यकर्त्यांनी श्री राजेन्द्र झोटींग यांचे शेतात झालेल्या या लागवड आंदोलनात सहभागी झाले,चोख पोलीस बंदोबस्तात हे आंदोलन पार पडले.

## युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मंठा युवा सेनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागातील**
**(प्रतिनिधी) - राजु शिंदेः-**

युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचा दरवर्षी वाढदिवस महाराष्ट्र राज्यात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. याच हेतूने आज मंठा युवा सेनेच्या वतीने एम एस ई बी हनुमान मंदिर या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिर येथे संपन्न झाले. यावेळी युवासेना तालुका प्रमुख डिगांबर बोराडे, गोपी गायकवाड, गोपी गायकवाड युवासेना शहर प्रमुख मंठा वझीर पठाण गोपाल खंदारे योगेश बोराडे पवन बोराडे मनिष बोराडे लक्ष्मण टोम्पे बाळु गवळु कुलदीप बोराडे बाबा बोराडे विष्णु बहाड बाळासाहेब टाके भागवत




चव्हाण यांच्यासह आदी युवासेनिक उपस्थित होते.
लोकमान्य ब्लड बँक

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ड्रीमलायनर नव्हे, स्वप्नांची राखरांगोळी



## विमानाची 'टेल विंग' वसतिगृहाच्या आवारात

एअर इंडियाचे विमान कोसळण्यापूर्वी अहमदाबादमधील डॉक्टर्स हॉस्टेलवर आदळले. त्यानंतर झालेल्या स्फोटात विमानाचा पुढचा भाग पूर्णपणे जळाला. केवळ विमानाची टेल विंग वसतिगृहाच्या आवारात तुटलेली व अडकून पडलेली दिसत आहे.

## प्रवास पुढे ढकलला अन् वाचलो

**अहमदाबाद** : सावजीभाई टिंबाडिया हे अहमदाबाद-लंडन विमानाने प्रवास करणार होते. मात्र, त्यांनी विमान प्रवास पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आपण या अपघातातून बचावलो. याबद्दल त्यांनी देवाचे आभार मानले. आपल्या लंडनमध्ये राहणाऱ्या मुलाला भेटण्यासाठी टिंबाडिया हे जाणार होते. मात्र, मी माझा प्रवास चार दिवसांनी पुढे ढकलला. या निर्णयामुळे माझे जीव वाचला. अपघातानंतर माझ्या मुलाने मला लंडनहून फोन केला. मी चांगली कामे केल्यानेच माझा जीव वाचला, असे मुलगा म्हणाला.









## देशातील पाच मोठे विमान अपघात

अहमदाबादहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला गुरुवारी मेघाणीनगर परिसरात अपघात झाल्याने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे. या अपघातात विमानातील २४२ जणांचा तसेच २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. विमानातील प्रवाशांमध्ये ब्रिटनच्या ५२ तसेच पोर्तुगालच्या ६ नागरिकांचाही समावेश होता. या घटनेने देशातील विमान अपघातांची मालिकाच डोळ्यासमोर आली आहे. त्यापैकी पुढील पाच मोठ्या विमान अपघातांची माहिती पुढीलप्रमाणे -

**१ हरयाणा (१९९६) : ३४९ जणांचा मृत्यू**

हरयाणातील चरखी दादरीजवळ १२ नोव्हेंबर १९९६ रोजी दोन विमानांची टक्कर झाली आणि त्यात ३४९ जणांना आपले प्राण गमवावे लागले. पायलट आणि हवाई वाहतूक नियंत्रण यांच्यातील गैरसमज आणि उंची योग्यरीत्या समजू न शकल्यामुळे हा अपघात झाला. हा देशातील आतापर्यंतचा सर्वात मोठा विमान अपघात म्हणून ओळखला जातो.

**२ अरबी समुद्र (१९७८) : २१३ जण ठार**

मुंबईहून दुबईला निघालेले विमान अरबी समुद्रावरून जात असताना झालेल्या अपघातात तब्बल २१३ जणांना आपला जीव गमवावा लागला. १ जानेवारी १९७८ रोजी झालेल्या या अपघातात बोइंग ७४७ विमान अरबी समुद्रात कोसळले. त्यामुळे विमानातील २१३ जण जागीच ठार झाले.

**३ कर्नाटक (२०१०) : १५८ प्रवाशांचा मृत्यू**

दुबईहून कर्नाटकला येणारे विमान लँड करताना धावपट्टीवरून घसरल्यामुळे झालेल्या अपघातात १६६ प्रवाशांपैकी १५८ जणांचा मृत्यू झाला होता. २२ मे २०१० रोजी एअर इंडियाचे ८१२ हे विमान खाली उतरवताना धावपट्टी लहान असल्यामुळे पायलटला ब्रेक लावण्यासाठी पुरेशी जागा शिल्लक राहिली नाही. त्यामुळे विमान धावपट्टीवरून घसरले आणि विमानाचे दोन तुकडे झाले.

**४ औरंगाबाद (१९९३) : ५५ जणांचा मृत्यू**

छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथून मुंबईला जाणारे विमान ट्रकला आदळल्यामुळे झालेल्या अपघातात ५५ जणांचा मृत्यू झाला होता. इंडियन एअरलाइन्सचे ४९१ हे विमान २६ एप्रिल १९९३ रोजी संभाजीनगर येथून उड्डाण घेत असतानाच, धावपट्टीवर एक ट्रक आडवा आला. पायलटला ट्रक वेळेत दिसला नाही. त्यामुळे विमान आणि ट्रकची टक्कर झाली. त्यानंतर विमानाला लागलेल्या आगीत ५५ जणांचा मृत्यू ओढवला.

**५ कोझिकोड (२०२०) : २१ जण ठार**

कोरोनाच्या काळात दुबईहून भारतीय नागरिकांना देशात परत आणताना एअर इंडियाचे विमान केरळमधील कोझिकोड विमानतळावर घसरल्यामुळे झालेल्या अपघातात २१ जण ठार झाले. 'वंदे भारत' मिशन अंतर्गत दुबईत अडकलेल्या भारतीय प्रवाशांना घेऊन येताना हे विमान कोझिकोड विमानतळावर घसरले, त्यात ११० प्रवासी जखमी झाले होते.



## ब्रिटनचे राजे चार्ल्स, पंतप्रधान कीर स्टार्मर यांना बसला धक्का

**लंडन** : अहमदाबाद विमान दुर्घटनेचे वृत्त कळताच ब्रिटनचे राजे चार्ल्स तृतीय आणि पंतप्रधान कीर स्टार्मर यांना धक्का बसला असून त्यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. या अपघातग्रस्त विमानात ५३ ब्रिटिश नागरिक प्रवास करीत होते.

राजा चार्ल्स यांनी सांगितले की, ते आणि राणी कॅमिला अहमदाबादमध्ये सकाळी घडलेल्या या भीषण घटनेने अत्यंत व्यथित झाले आहेत. 'या अत्यंत धक्कादायक घटनेत अनेक देशांतील लोक प्रभावित झाले आहेत. या विमानातील प्रवाशांचे नातेवाईक व मित्र जे आपल्या प्रियजनांच्या बातम्यांची प्रतीक्षा करत आहेत, त्यांच्यासाठी आम्ही विशेष प्रार्थना करतो आणि मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो,' असे बकिंगहॅम पॅलेसने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी म्हटले आहे की, अहमदाबाद शहरात अनेक ब्रिटिश नागरिक असलेले लंडनकडे जाणारे विमान कोसळल्याचे दृश्य अत्यंत विनाशकारी होते. या अपघाताचे वृत्त कळताच मला धक्का बसला असून मृतांच्या नातेवाईकांच्या दुःखात मी सहभागी आहे.

## राजस्थानमधील ५ जणांचा मृत्यू

एअर इंडियाच्या विमान अपघातात राजस्थानमधील पाच जणांचा मृत्यू झाला. उदयपूरचे संगमरवर व्यापारी संजीव मोदी यांचा मुलगा शुभ आणि मुलगी शगुन हे याच विमानातून लंडनला जात होते. याशिवाय उदयपूरचे वर्दीचंद मेनारिया आणि प्रकाश मेनारिया हे देखील त्याच विमानात होते. दोघेही लंडनमध्ये खानसामा म्हणून काम करीत होते. बालोत्रा येथील रहिवासी मदन सिंग राजपुरोहित यांची मुलगी खुशबू हिचाही या विमान अपघातात मृत्यू झाला. खुशबूचा नवरा लंडनमध्ये डॉक्टर असून ती त्याच्याकडे परत जात होती.

## केबिन क्रू अपर्णा महाडिक तटकरेंच्या भाच्याची पत्नी

अपघातग्रस्त विमानात १२ क्रू मेंबर्स होते. त्यापैकी एक क्रू मेंबर अपर्णा महाडिक (कर्मचारी क्रमांक : ८०००८८७२) या खासदार सुनील तटकरे यांचा सख्खा भाचा अमोल यांच्या पत्नी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्या एअर इंडियात 'सीनियर केबिन क्रू' म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे पती अमोल स्वतःही एअर इंडियामध्ये पायलट म्हणून कार्यरत आहेत. ते या विमान अपघाताच्या दोन तास आधी दिल्लीत लँड झाले होते. अपघाताची माहिती मिळताच ते तत्काळ अहमदाबादला रवाना झाले.






## एअर इंडियाचे सोशल मीडिया हँडल्स, वेबसाईट काळ्या रंगात

लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान अहमदाबादच्या मेघाणीनगर परिसरात कोसळल्यानंतर टाटा समूहाच्या एअर इंडिया एअरलाइनने शोक व्यक्त केला आहे. एअर इंडियाचे सोशल मीडिया अकाऊंट आणि अधिकृत संकेतस्थळ काळ्या रंगात बदलले आहे. एअर इंडियाने आपल्या अधिकृत एक्स आणि इन्स्टाग्राम हँडल्सवरील 'लोगो' काळ्या रंगात बदलले आहेत. वेबसाईटच्या होमपेजवर 'एआय १७१' हे नावही काळ्या पार्श्वभूमीवर झळकत आहे. अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे एआय-१७१ हे विमान उड्डाण घेतल्यानंतर काही वेळातच कोसळले. यात विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती अहमदाबाद पोलिसांनी दिली आहे.

## बदलापूरला राहणारे सहवैमानिक दीपक पाठक यांचा मृत्यू

**बदलापूर**: अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या गुरुवारी दुपारी झालेल्या विमान दुर्घटनेत सहवैमानिक बदलापुरातील दीपक पाठक यांचा मृत्यू झाला आहे.

या विमान दुर्घटनेचे वृत्त कळताच दीपकच्या मित्रपरिवाराने त्याच्या निवासस्थानी धाव घेतली आहे.

अहमदाबाद-लंडनला अपघातात दीपक पाठक हा बदलापुरात राहणारा होता. या विमान दुर्घटनेबाबत समजताच दीपकच्या बदलापुर पूर्वेकडील कात्रप परिसरातील रावल



कॉम्प्लेक्स या निवासस्थानी त्याच्या मित्रांनी गर्दी केली आहे. त्यांना दुःख अनावर झाले आहे. या घटनेनंतर त्याच्या घरी मित्रपरिवाराची गर्दी झाली आहे.

> आम्हाला अद्यापही दीपकच्या बाबतीत कोणतीही अधिकृत माहिती मिळाली नाही. त्यामुळे आम्ही अजूनही त्याच्या बाबतीत आशावादी आहोत.
> **: श्रुतिका शेजवळ, बहीण**

> अनेक वर्षांपासून आम्ही मित्र आहोत. दीपक स्वभावाने खूप प्रेमळ आणि शांत होता. कामावरुन कधीही आला तरी एक दिवस तो मित्रपरिवारासाठी काढायचा. त्याच्या सगळ्या कामाविषयी तो आम्हाला सांगायचा. या घटनेतून तो सुखरूप घरी यावा, अशी आम्हाला आशा आहे.
> **आदित्य पाटील, दीपकचा मित्र**

विमान टेक ऑफ करण्यापूर्वी दुपारी दीपकचे त्याच्या आईशी फोनवरून बोलणे झाले होते. त्यानंतर कुटुंबातील कोणाचाही दीपकशी संवाद झालेला नाही.

दीपक हा गेल्या ११ वर्षांपासून एअर इंडियात नोकरीला होता. त्याच्या कुटुंबात दोन विवाहित बहिणी, आई, वडील आणि तो असा त्यांचा परिवार आहे.

## काळ आला, पण वेळ आली नव्हती!

**अहमदाबाद** : घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या या जगात प्रवास करताना ट्रेन, बस अथवा विमान पकडण्यासाठी अगदी काही जण जीवाचा आकांत करत असतात. पण जीवाचे रान करूनही अनेकदा काही क्षणाकरिता आपल्याला वेळेत पोहोचता येत नाही, त्यावेळी मनाला रूखरूख लागलेली असते. पण काही वेळेला झालेला उशीरही तितकाच फायदेशीर ठरतो, याचा प्रत्यय भूमी चौहान यांनी गुरुवारी अनुभवला.

भूमी चौहान या अहमदाबाद येथून लंडनला जाणारे विमान पकडण्यासाठी विमानतळावर दाखल झाल्या. मात्र १० मिनिटे उशीर झाल्यामुळे विमानाने आधीच उड्डाण केले होते. त्यामुळे त्यांना विमानतळावरून निराशेनेच घरी

### १० मिनिटे उशीर झाल्याने भूमी चौहान बालंबाल बचावल्या



परतावे लागले. पण विमानाने हवेत भरारी घेतल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांतच ते कोसळल्याची बातमी ऐकून भूमी यांच्याही काळजात अगदी धस्स झाले. वाहतूककोंडीमुळे उशीर झाला नसता आणि पुढच्या आयुष्याची स्वप्ने कवेत घेऊन त्यांनीही विमानातून उड्डाण केले असते तर कदाचित त्यांच्या आयुष्याची, स्वप्नांची राखरांगोळी झाली असती. केवळ दैव बलवत्तर म्हणून त्यांचा जीव वाचला.

भूमी चौहान आपली सुट्टी आटोपून लंडनसाठी निघाल्या होत्या. निघताना त्यांचे पतीसोबत बोलणेही झाले होते. वेळेत विमान पकडण्यासाठी निघालेल्या भूमी यांचा जीव वाहतूककोंडीमुळे अक्षरशः गुदमरला होता. पण परमेश्वराच्याच मनात असल्यामुळे त्यांना विमान पकडण्यासाठी १० मिनिटे उशीर झाला आणि गणपती बाप्पा पावला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

त्या म्हणाल्या की, "अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनला जाणाऱ्या विमानातूनच मी प्रवास करणार होते. सुट्टी आटोपून लंडनला निघताना मला वाहतूककोंडीमुळे उशीर झाला. विमान वेळेत निघाले होते, पण मला १० मिनिटे विलंब झाल्यामुळे विमानात बसता आले नाही.

## विमान अपघातानंतर जगभरातून शोक

**मॉस्को/ओटावा** : एअर इंडियाच्या विमानाला अहमदाबाद येथ झालेल्या अपघातानंतर संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे.

अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान उड्डाण केल्यानंतर काही वेळात कोसळले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शोकसंदेश पाठवून अपघाताबद्दल 'तीव्र दुःख' व्यक्त केले.

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी सांगितले की, या अपघाताबद्दल कळताच ते 'खूपच व्यथित' झाले. माझ्या भावना सर्व प्रवाशांच्या प्रियजनांबरोबर आहेत. कॅनडाचे परिवहन अधिकारी भारतीय समकक्षांशी सतत संपर्कात आहेत. संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख अँटोनियो गुटेरेस यांनीही सांगितले की, "एअर इंडिया विमानाच्या अपघाताची बातमी ऐकून मी अत्यंत व्यथित झालो आहे. सर्व पीडितांच्या कुटुंबीयांना माझ्या अंतःकरणपूर्वक सहवेदना."

युरोपियन युनियनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लायन यांनी लिहिले : "अहमदाबादमधील विमान दुर्घटनेची बातमी वेदनादायी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, या दुःखद क्षणी युरोप भारताच्या पाठीशी ठामपणे उभा आहे."

युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमीर झेलेन्स्की यांनी या घटनेला "भयानक घटना" म्हणत मोदी आणि भारतातील सर्व नागरिकांप्रती सहवेदना व्यक्त केली. "भारत, ब्रिटन, आणि कॅनडामधील सर्व पीडित कुटुंबांसोबत आम्ही आहोत. आम्ही सर्व प्रार्थना करतो की जास्तीत जास्त जीव वाचावेत," असे त्यांनी म्हटले.

## पत्नी-मुलीची भेट हुकली!

### विमान अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचा मृत्यू

**आपल्या** प्रियजनांना भेटण्याची ओढ लागलेली असतानाच, गुजरातच्या माजी मुख्यमंत्र्यांना जीव गमवावा लागला आहे. अहमदाबादहून लंडनला निघालेले विमान उड्डाण घेतल्यानंतर अवघ्या काही मिनिटांत मेघाणीनगर परिसरात कोसळल्याने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचा मृत्यू झाला आहे.

मुलगी लंडनमध्ये असल्यामुळे विजय रूपाणी यांच्या पत्नी अंजली यासुद्धा गेल्या काही महिन्यांपासून मुलीच्या घरी गेल्या होत्या. मुलीला भेटण्यासाठी आणि पत्नीला पुन्हा मायदेशी परत आणण्यासाठी विजय रूपाणी हे गुरुवारी दुपारच्या विमानाने



लंडनला निघाले होते. एअर इंडियाचे बोइंग ड्रीमलायनर विमानातील २-डी या सीट क्रमांकावरून ते बिझनेस क्लासमधून प्रवास करत होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. मुलीची भेट घेण्यासाठी आणि पत्नीला घरी आणण्याआधीच त्यांना मृत्यूने गाठले. मात्र त्यांच्या शेजारच्या मंडळींनी मात्र त्यांच्या मृत्यूबद्दल हळहळ व्यक्त केली.

विजय रुपाणी हे भाजपचे गुजरातमधील ज्येष्ठ आणि बडे नेते होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत विश्वासू म्हणून विजय रूपाणी ओळखले जायचे. मोदी हे २०१४मध्ये देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर आनंदीबेन पटेल यांच्याकडे गुजरातचे मुख्यमंत्रीपद आले होते. पण काही घटना हाताळण्यात असमर्थ ठरल्याबद्दल आनंदीबेन यांना हटवून विजय रूपाणी यांच्यावर मोदींनी विश्वास दाखवला होता.







## महाराष्ट्र सरकारतर्फे हेल्पलाइन क्रमांक जाहीर

अहमदाबाद विमान अपघातानंतर महाराष्ट्र सरकारने हेल्पलाइन क्रमांक जारी केले. मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाने ०२२-२२०२७९९०, ०२२-२२७९४२२९ आणि ९३२१५८७१४३ हे क्रमांक जाहीर केले आहेत. तसेच १,०७० हा आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक देखील जारी केला आहे. या दुर्घटनेशी संबंधित माहितीसाठी नातेवाईक आणि बाधित नागरिक या क्रमांकांवर संपर्क साधू शकतात, असे त्यात म्हटले आहे.